
## कादंबरी-कल्पद्रुम-पुष्पमाला.

### पुष्प पहिलें.

...मयी.

... के. ...

म. ग्रं. सं. ठाणे
लेखक
पुस्तकाचें नांव
विषय
सम्रहालय क्रमांक





# लावण्यमयी.

ही छोटेखानी कादंबरी

अनंत [illegible]शव चितळे वांईकर.

“ भारतवर्षीय युवतिरत्नमाला ” “ सत्यप्रभाव अथवा भोजराजाचें स्वप्न ” “ राजा अलकेश ” इ. इ.

पुस्तकांचे कर्ते यांनीं लिहिली

ती

चितळे आणि मंडळी यांनीं

वांई येथें “ मोदवृत्त ” छापखान्यांत छापून

प्रसिद्ध केली.

( सर्व हक्क राखिले आहेत. )

किंमत ४ आणे.

हें

कादंबरी-कल्पद्रुमाचें

**पहिलें पुष्प**

त्याच्या परमोदार आणि रसिक

आश्रयदात्यांस

प्रेमपुरस्सर अर्पण केलें

असे.

पुस्तककर्ता.

# प्रस्तावना.

पुढील छोटेखानी कादंबरी मूळ बंगाली भाषेंत लिहिलेली असून तिच्या हिंदी भाषांतरावरून ती मराठींत आणिली आहे. **कादंबरी-कल्पद्रुमाच्या** द्वारें हिंदी आणि बंगाली भाषेंतील निवडक कादंबऱ्या मराठींत आणण्याचा आमचा संकल्प आह्मीं आमच्या " उद्देश " या लेखांत व्यक्त केलाच आहे. प्रस्तुतची कादंबरी अगदीं लहान असूनही ती किती चटकदार आहे, हें सहृदय वाचकांच्या प्रत्ययास येईलच. आणि या एका लहानशा कादंबरीवरून पुढील मोठ्या कादंबऱ्या किती मनोरम येतील याची आमच्या रसिक वाचकांस चांगली कल्पना करितां येईल. अवघ्या भरतखंडांत देशी वाङ्मया-संबंधानें बंगाली भाषेनें अग्रेसरत्व संपादिलें असून तींत कादंबरी विषयक वाङ्मय तर अत्यंत विपुल आणि श्रेष्ठ प्रतीचें आहे. प्रसिद्ध बंगाली कादंबरीकार रायबहादूर बंकिमचंद्र चतरजी यांच्या " दुर्गेशनंदिनी " " आनंदमठ " इत्यादि कादंबऱ्यांचीं मराठी भाषेंत भाषांतरें होऊन तीं पूर्वींच महाराष्ट्र वाचकांना पसंत पडलीं आहेत. परंतु त्याहींपेक्षां सुरस व चटकदार कादंबऱ्या मराठींत आणण्यासारख्या आहेत. त्या क्रमाक्रमानें आह्मी आमच्या मासिक पुस्तकाच्या द्वारें मराठींत आणण्याचें योजिलें आहे. या कृत्यास रसिक व उदार महाराष्ट्र-भाषाभिमानी लोकांकडून मात्र वारंवार प्रोत्साहन मिळत गेलें पाहिजे.

प्रस्तुत सुरूं असलेल्या कादंबऱ्यांपैकीं आणखी कोणत्या तरी दोन कादंबऱ्या यंदाचे वर्षांत संपूर्ण करण्याचा विचार आहे. त्यांतही " **अकबर** " या कादंबरीचें प्रथम खंड तर संपूर्ण व्हावया-चेंच. बाकीच्या दोन मोठ्या असल्यामुळें कदाचित् पुढच्या वर्षावर

जातील. पहिल्या दोन वर्षांत मिळून कल्पद्रुमाच्या ग्राहकांस १२०० पृष्ठांच्या पांच किंवा सहा कादंबऱ्या संपूर्ण होऊन मिळतील. असा अदमास आहे. शिवाय लावण्यमयीसारख्या छोटेखानी संपूर्ण कादंबऱ्याही मधून मधून दिल्या जातील. कादंबरीच्या भोक्त्यांनीं मात्र ही संधि फुकट न घालवितां आपला उदार हस्त पुढें करून आह्मांस प्रोत्साहन द्यावें अशी सविनय विनंति आहे.

शेवटीं परम कृपाळू ईश्वरानें आह्मांस हें कृत्य यथास्थित चालविण्याचें सामर्थ्य द्यावें, ह्मणून त्याची अनन्यभावानें प्रार्थना करून ही प्रस्तावना संपवितों.

श्रीक्षेत्र वाई. संपादक
४–६–१९००. " कादंबरी–कल्पद्रुम. "

# लावण्यमयी.

## प्रथम परिच्छेद.

### सरला कोठें गेली ?

बंगालप्रांतीं हरिपूर नांवाचें एक लहानसें गांव आहे. येथें रमेशबाबू नांवाचे मोठे श्रीमान् गृहस्थ रहात असत. त्यांचें राहण्याचें घर मोठें सुंदर असून पदरीं चाकरमाणसेंही पुष्कळ होतीं. बाहेर मोठमोठ्या आठदहा पखारी असून गोशाला अश्वशालाही बऱ्याच होत्या. याप्रमाणें बाबूसाहेबांस सर्व गोष्टींची अनुकूलता असतां एका संततीच्या अभावामुळें त्यांचें घर सुनें दिसत असे. त्यांची पत्नी दोन वेळ गरोदर होऊन प्रसूति होतांच संतति गतप्राण झाली. त्यानंतर त्यांनीं आपल्या गृहिणीसहवर्तमान अनेक तऱ्हेचे व्रतोपवास केले, तीर्थयात्रा केल्या, दानें दिलीं, जप केले, कथा श्रवण केल्या, गृहिणीस अनेक तऱ्हेचे औषधोपचारही करून पाहिले; परंतु, यांपैकीं कोणत्याही उपायानें त्यांस पुढें संततीची प्राप्ति झाली नाहीं.

एके दिवशीं रात्रीं रमेशबाबू आपल्या अंत:पुरांत सस्त्रीक निद्रासुखाचा उपभोग घेत होते. ते वर्षाकाळाचे दिवस असून चहूंकडे अंधकार पसरला होता. मेघगर्जना आणि विद्युत्प्रकाश यांसह एकसारखी जलवृष्टि होत होती. वारा फार सोसाट्यानें वहात होता. घराचीं सर्व दारें बंद केलीं असतांही आंतील निद्रिस्थ मनुष्यांस थंडी वाजल्यावांचून

रहात नव्हती. अशी स्थिति असल्यामुळें बाबूसाहेब नखशिखांत दुलई पांघरून निजले असतां त्यांनीं अत्यंत मनोरम अशा स्वप्नसृष्टींत प्रवेश केला.

त्यांनीं असें स्वप्न पाहिलें कीं, इतक्या दिवसानंतर जणूं त्यांना एक बालक झालें आहे ! तें बालक अत्यंत सुंदर, त्याचें नवनीतसदृश कोमल अंग, आणि त्याचे ओष्ठप्रांतावर मनोहर हास्य क्रीडा करीत आहे. ते त्या बालकास आपल्या मांडीवर घेऊन त्याचे लाड करीत असतां जणूं काय स्वर्गसुखाचा उपभोग घेत होते. इतक्यांत तें बालक रडूं लागलें. त्यांनीं अनेक प्रकारें त्यास खेळविण्याचा प्रयत्न केला; परंतु, कांहीं केल्या त्याचें रडणें बंद होईना. त्यामुळें रमेशबाबूंची झोंप-मोड होऊन ते जागे झाले. तरी अद्यापि तो बालकाचा रोदनध्वनि त्यांचे कानीं पडतच होता. रमेशबाबू पुरते जागे होऊन दोन्ही हातांनीं आपले डोळे चोळूं लागले, तरी देखील बालकाचा रडण्याचा स्वर जशाचा तसाच त्यांचे कानीं येत होता. तेव्हां ते घाबरून उठले आणि आपल्या स्त्रीस हाका मारूं लागले.

" प्रिये प्रिये, लवकर ऊठ पाहूं ! "

रमेशबाबूंच्या स्त्रीचें नांव सरला असें होतें. वर लिहिल्याप्रमाणें त्यांनीं तिजला एक दोन वेळ हांक मारिली. परंतु, उत्तर मिळालें नाहीं. जिकडे तिकडे सामसूम ! खोलींतील दिवा बहुधा विझण्याच्या बेतांत असल्यामुळें त्याचा प्रकाश असून नसून सारखाच होता. किंबहुना खोलींत अंधेरच होता ह्मटलें तरी चालेल. बालकाचा रोदनध्वनि ऐकून आश्चर्यचकित झाल्यामुळें रमेशबाबू वारंवार आपल्या स्त्रीस हाका मारूं लागले. परंतु, उत्तर कोण देणार ! त्यांनीं अंधेरांत आपल्या बिछान्यावर चहूंकडे दोन्ही हातांनीं चाचपून पाहिलें. तथापि, स्त्रीचा मागमूसही त्यांस लागला नाहीं. इकडे बालकाचें रडणें कानीं पडत आहे आणि स्त्रीचा तर पत्ताच नाहीं ! हें सगळें

स्वप्नच ह्मणावें तर बालक समोर प्रत्यक्ष रडत आहे. मग काय विचारतां ! बाबूसाहेबांची पांचावर धारण बसली. ते लगबगीनें उठून उभे राहिले. त्यांनीं दिव्याची वात सारून दिवा मोठा केला. खोलींत चांगला उजेड पडला. बाबूसाहेब नीट न्याहाळून पहातात तों त्यांच्या स्त्रीच्या बिछान्यावर एक महिन्याची तान्ही कन्या आपल्या अप्सरेसारख्या सुंदर रूपानें सर्व गृह प्रकाशित करीत असलेली त्यांच्या दृष्टीस पडली. त्या कन्येच्या कमनीय रूपाकडे पाहतांच बाबूसाहेबांच्या पोटांत प्रेमाचा उमाळा येऊन त्यांनीं तिला एकदम उचलून आपल्या मांडीवर घेतलें ! अहाहा, स्वप्नामध्यें ज्या बालकाचें मुख पाहून ते स्वर्गसुखाचा उपभोग घेत होते, तेंच हें बालक ! बाबूसाहेबांनीं मांडीवर घेतांच ती कन्या रडतांना थांबली आणि आपल्या पाणीदार नेत्रांनीं बाबूसाहेबांच्या मुखाकडे टक लावून पाहूं लागली. तेव्हां त्यांनीं पुन्हां कितीकदां तरी हाका मारिल्याः—

" प्रिये ! प्रिये !! कुठें गेली बरें ? "

बाबूसाहेबांचें हाका मारणें निष्फळ होतें. सरला मुळीं घरांतच नव्हती, मग ओं कोठून देणार ! बाबूसाहेबांनीं हाका मारण्याचा धूम सपाटा लाविला. त्यांना वाटलें सरला घरांत इकडे तिकडे कोठें गेली असेल. पुष्कळ हाका मारूनही जेव्हां सरला ओ देईना तेव्हां त्यांनीं घाबरून खोलीचें दार उघडिलें आणि एका दासीस हाक मारिली. अशा प्रकारें गडबड सुरू होतांच घरांतील सर्व माणसें जागीं झालीं. आणि बाबूसाहेबांच्या अंतःपुरांत आलीं. परंतु, त्यांत सरला कोठें होती ?

सर्व माणसें त्या सुंदर बालकाला पाहून आश्चर्यचकित झालीं. बाबूसाहेब ह्मणाले " मी एका तान्ह्या बालकाचा रडण्याचा स्वर ऐकून जागा झालों आणि पाहतों तों हें सुंदर बालक येथें माझ्या दृष्टीस पडलें. याला येथें कोणीं आणिलें ? "

कोणीही या प्रश्नाचें उत्तर देऊं शकले नाहींत. सर्वांनीं आंतबाहेर चहूंकडे शोधून पाहिलें. बाबूसाहेबांनींही यथासंभव शोध करून पाहिला. परंतु, सरलेचा पत्ता लागला नाहीं, किंवा बालकास कोणीं आणून ठेविलें तेंही कळलें नाहीं. तेवेळीं भीतीनें बाबूसाहेबांचें हृदय कांपूं लागलें. त्यांच्या मनांत नाना तऱ्हेच्या विचारतरंगांनीं एकच काहूर करून सोडिलें. " सरलेनें आत्महत्या केली असावी काय ? तसें असेल तर तिच्या शरीराचा तरी शोध लागला पाहिजे. कोठें गेली बरें ? ती तर परम पतिव्रता आहे ! बरें ही कन्या तरी कोठून आली ? " अशा प्रकारच्या अनेक बऱ्यावाईट कल्पना चालवून बाबूंनीं शोध केला. परंतु कांहींएक पत्ता लागला नाहीं. पुढें एकसारखा एक महिनाभर सरलेचा शोध चालला होता. परंतु निष्फळ ! या एकंदर धामधुमींत बाबूसाहेबांस त्या कन्येचें एकदम विस्मरण होऊन गेलें होतें. ह्मण आहेना कीं " नगाऱ्याची घाई तिथें टिमकी तुझें काई. "

## द्वितीय परिच्छेद.

### कन्येचें नामकरण.

मागील भागांत वर्णन केलेला प्रकार घडून एक महिना लोटला. एकेदिवशीं सायंकाळीं आपल्या घरासमोरील बागेंत रमेशबाबू अत्यंत चिंताक्रांत होत्साते बसले असतां एक दासी त्या सुंदर कन्यारत्नास कडेवर घेऊन खेळवीत असलेली त्यांच्या नजरेस पडली. तिला पाहतांच बाबूसाहेबांस तिची आठवण झाली. पहिल्या दिवसापासून

जें त्यांना तिचें विस्मरण पडलें होतें तें पुन्हां आज स्मरण झालें. त्यांनीं त्या दासीस जवळ बोलाविलें. दासी जवळ आल्यानंतर ते त्या कन्येच्या मुखाकडे टक लावून पाहूं लागले. त्यांनीं मोठ्या प्रेमानें त्या सुकुमार कन्येस आपल्याजवळ घेऊन अगदीं गळ्याशीं गळा लावून तिचें चुंबन घेतलें. सरलेच्या मुखाशीं या कन्येच्या मुखाचें कांहीं सादृश्य आहे काय ? ह्मणून बाबूसाहेब लक्ष्यपूर्वक न्याहाळून पाहूं लागले. परंतु त्यांना तशा प्रकारचें सादृश्य दिसून आलें नाहीं. ते ह्मणाले:—

"हें बालक कोठून आलें या गोष्टीचा आपण आजवर शोध केला नाहीं, हें ठीक नाहीं. या संबंधांत योग्य रीतीचा शोध न करणें अन्यायाचें होईल. शिवाय, न जाणो या कन्येच्या मातापितरांच्या शोधांत धाग्यास धागा लागून सरलेचाही कांहीं पत्ता लागल्यास मोठेसें आश्चर्य नाहीं." अशा प्रकारचा विचार करून बाबूसाहेबांनीं पुन्हां शोध करण्यास आरंभ केला. त्यांनीं आपल्या अंत:पुरांत घडलेली सर्व हकीकत वर्तमानपत्रद्वारें प्रसिद्ध करून व लोकांस त्या गोष्टीचा शोध लावण्याविषयीं बक्षिसें लावून विनंति केली. गांवोगांव दवंडी पिटविली, जागोजाग लोक रवाना केले, परंतु कोठूनही त्यांना अनुकूल अशी खबर आली नाहीं किंवा त्या बालकाचा कोणी वारस उभा राहिला नाहीं. शेवटीं बाबूसाहेब या गूढ गोष्टीचा शोध करण्याचा नाद सोडून देऊन स्वस्थ बसले.

पूर्वीं सांगितलेंच आहे कीं, रमेशबाबूंस अद्भुत रीतीनें त्यांच्या अंत:पुरांत खुद्द त्यांचे पत्नीचे बिछान्यावर सांपडलेलें बालक एक अत्यंत लावण्यमयी कन्या होती. तिजबद्दल कोणीही वारसदार न उभा राहिल्यानें बाबूसाहेबांनीं तिच्या अनुपम लावण्यावरून तिचें लावण्यमयी असें नांव ठेवून, आपल्या पोटच्या कन्येप्रमाणें तिचें पालनपोषण करण्यास सुरुवात केली. त्यांनीं मोठ्या समारंभानें

तिचा नामकरण आणि अन्नप्राशन विधि केला. दिवसेंदिवस बाबूसाहेबांची त्या कन्येवरील प्रीति वाढत चालली. फार तर काय, पण त्यांच्या तिजवरील स्नेहवात्सल्यास सीमा नाहींशी झाली. आणि इतर लोकही, ती बाबूसाहेबांची पोटची कन्या नव्हे, ही गोष्ट समूळ विसरून गेले.

आणि **लावण्य** ! ती बिचारी काय जाणे ? ती जेव्हां येथें आली, तेव्हां केवळ एक महिन्याचें नेणतें लेंकरूं होती. आतां तीही रमेशबाबूंस आपला पिता आणि पालन करणाऱ्या दाईस आपली माता समजूं लागली. या व्यतिरिक्त तिला दुसरें कांहींच ठाऊक नव्हतें; आणि असणार तरी काय ?

या घडलेल्या गोष्टीस आठ नऊ वर्षें होऊन गेलीं. लावण्य दिवसेंदिवस शुक्लपक्षांतील शशिकलेप्रमाणें वाढत चालली. तिचें लावण्यही तिच्या शरीराबरोबरच किंबहुना त्याहूनही जास्त प्रमाणानें वाढत चाललें. आणि तिच्या स्वर्गीय अंगकांतीनें रमेशबाबूंचें घर नंदनवनाप्रमाणें शोभायमान दिसूं लागलें.

# तृतीय परिच्छेद.

## तापसी आणि सुधाकर.

एके दिवशीं दोन प्रहरच्या सुमारास लावण्यमयी एकटीच आपल्या घराच्या मागील दारीं असलेल्या बागेंत झाडांच्या सावलींत खेळत होती. ती केव्हां फुलें तोडी आणि केव्हां फुलपाखरें धरण्याकरितां त्यांच्या मागें धांवत जाई. हा प्रकार तेथून कांहीं अंतरावर

असलेलीं दोन मनुष्यें मोठ्या कौतुकानें अवलोकन करीत होतीं. त्यांपैकीं एक तर तापसी होती आणि दुसरा पंधरा सोळा वर्षांचा कुमार होता. तापसीनें लावण्यमयीकडे बोट दाखवून कुमारास ह्मटलें:—

" सुधाकर, जा तिच्या बरोबर खेळ."

सुधाकर संकोचवृत्तीनें तिजकडे जाण्यास लाजत होता. कारण, त्या अनोळखी मुलीबरोबर तिनें न बोलावितां खेळावयास जाणें त्याला अनुचित वाटलें. परंतु, तापसी वारंवार त्याला तिजकडे जाण्याकरितां ढकलीत होती. इकडे लावण्यमयीही खेळतां खेळतां तिकडेच चालली होती. इतक्यांत एका गुलाबाच्या डाहळीस तिच्या अंगावरील ओढणी(फडकी)चा पदर अडकला. ती आपला पदर सोडवायला ह्मणून गेली तों तो अधिकच अडकवून बसली ! त्या वेळीं ती त्रासून अगदीं रडण्याच्या बेतांत आली होती. इतक्यांत तिची दृष्टि सुधाकराकडे गेली. तिकडून सुधाकरही ती तिची अवस्था पाहून त्वरित तिजकडे चालून आला. तापसी मात्र एका वृक्षाच्या आड उभी राहून त्या दोघांची पुढील लीला अवलोकन करूं लागली. सुधाकरानें लावण्यमयीचे संनिध येऊन तिचा हात धरून हंसत हंसत ह्मटलें:—

**सुधाकर**—अरे ! हें काय झालें ?

**लावण्य**—माझ्या ओढणीच्या पदराची आंचळी या गुलाबाच्या कांट्याला अडकली. ती जरा सोडवून दे बरें.

**सुधाकर**—मग त्याला इतकें भिण्याचें काय कारण आहे ? तूं हालूं बिलूं नको. मी अत्ता सोडवून देतों. हलण्यानें अधिकच अडकून जायचें एखादें.

**लावण्य**—नाहीं, मी हलायबिलायची नाहीं. अगदीं जशीच्या तशी उभी राहीन.

सुधाकर मोठ्या कष्टानें एक एक करून तिचा पदर कांट्यावरून सोडवूं लागला. तेव्हां लावण्य ह्मणाली:—

लावण्य—पहा अरें ! माझा पदर फाटूं बिटूं देऊं नको. नाहीं तर दाई मा मला मारील.

सुधाकर—दाई मा कोण ?

लावण्य—तुला नाहीं ठाऊक ? जिनें मला लहानाची मोठी केली ?

सुधाकर—अरेच्या ! आणखीं तुला आई नाहीं ?

लावण्य—तीच तर माझी आई. तुला दाई मा नाहीं ?

सुधाकर काय उत्तर देणार ? त्याला तिच्या प्रश्नाचें उत्तर न सुचून तो ह्मणाला:—

सुधाकर—हो, मला दाई मा नाहीं.

लावण्य—( इतक्यांत थोडासा पदर फाटलेला पाहून ) अहारे, हा पहा माझा पदर फाटला. तूं कांहीं कामाचा नाहींस !

या तिच्या भाषणानें किंचित् लज्जित होऊन सुधाकर ह्मणाला:—

सुधाकर—तुला का तुझी दाई मा मारते होय ?

लावण्य—फार नाहीं मारीत. दांडगाई केली तर मात्र मारते. पण ती मला आपल्या प्राणापेक्षांही अधिक चाहते.

यावेळीं सुधाकरानें तिचा पदर गुलाबाच्या कांट्यापासून पुरता सोडविला होता. तेव्हां ती त्यास ह्मणाली:—

लावण्य—आमच्या घरीं चलतोस ?

सुधाकर—तुझ्या घरीं आलों तर तुझ्या घरचीं माणसें रागावतील. मी आतां आपल्या घरीं जातों. जाऊं ना ?

लावण्य— तुझें घर कोणीकडे आहे ?

सुधाकर— या इकडच्या फुलबागेंत आहे.

लावण्य— तुझें घर देखील खूप चांगलें आहे ?

सुधाकर—नाहीं. आह्मी गरीब लोक आहोंत.

**लावण्य**—तर मग तूं आमच्या घरांत कां नाहीं येऊन रहात ?

**सुधाकर**—तुझे घरवाले आह्मांला राहूं देतील ?

**लावण्य**—कां बरें नाहीं राहूं देणार ? मी सांगेन बाबांना ! चल.

असें ह्मणून लावण्यमयीनें त्याचा हात धरिला. सुधाकरानें तिला झुकांडी देण्याच्या मिषानें ह्मटलें:—

" चल. तुला फुलें तोडून देऊं ? "

लावण्य अत्यंत आनंदित होऊन ह्मणाली:—

" फुलें नकोत. मला एक फुलपाखरूं धरून दे. "

त्यावेळीं तेथील फुलझाडांवर अनेक तऱ्हेचीं रंगीबेरंगीं फुलपाखरें उडत होतीं. तीं दिसण्यांत फारच सुंदर दिसत होतीं. प्रत्यक्ष फुलें देखील सुंदर खरीं; परंतु, त्यांच्यांत जीवनकला कोठें आहे ? आणि मनुष्यस्वभावच असा आहे कीं, सहज प्राप्त होणाऱ्या वस्तूपेक्षां पळत्या वस्तूकडे त्याचें मन अधिक वेधतें. त्यामुळें फुलपाखरूं पकडण्याकडे लावण्यमयीचें चित्त जास्त वेधलें होतें.

सुधाकर एका फुलपाखरास पकडण्याकरितां त्याचे मागें धावूं लागला. परंतु, या जगांत आशा करण्यानें कधीं इष्ट वस्तु लौकर प्राप्त होत असते काय ? बिचारा सुधाकर जितका धावे, तितकें फुलपाखरूंही उडून पुढें जाई. लावण्यमयीही त्याचे मागोमाग धांवत होती. सुधाकर एक देखील पाखरूं पकडूं शकला नाहीं. तें पाहून लावण्य मोठ्यानें हांसली. त्यावर सुधाकर लज्जित होऊन पुन्हां मोठ्या ईर्ष्येनें फुलपाखरूं धरण्याचा प्रयत्न करूं लागला. सुमारें एक तास अशा धावाधावींत लोटला असेल; परंतु तितक्या अवधींत एक तरी फुलपाखरूं सुधाकराचे हातीं लागलें असेल तर शपथ ! इतक्यांत लावण्यमयी पाठीमागून आनंदानें हांसत हांसत ह्मणाली— " पहा, तुला नाहीं धरतां आलें पण मीं धरिलें. "

लावण्यमयीच्या विनोदी भाषणानें किंचित् लज्जित होऊन सुधा-

करानें मागें वळून पाहिलें, तों खरोखरच तिनें आपल्या कोमल अंगु-लींत एक सुंदर फुलपाखरूं दाबून धरिलेलें त्याच्या दृष्टीस पडलें. सुधा-करानें आश्चर्ययुक्त होऊन विचारिलें:—

**सुधाकर**—अरेच्या ! तूं याला कसें पकडलेंस ?

**लावण्य**—कसें ह्मणजे ? तें माझ्या अंगावर येऊन बसलें होतें. हा ! हा ! आतां माझें लगीन होईल.

**सुधाकर**—तेंग कशावरून ? फुलपाखरूं अंगावर बसलें ह्मणजे का लग्न होतें ?

**लावण्य**—हो तर ? माझी दाई मा मला सांगत होती. तुला काय ठाऊक आहे !

इतकें बोलून **लावण्यमयी** त्या फुलपाखरासह पळून जाण्याच्या बेतांत होती. तों सुधाकरानें तिचा हात धरून ह्मटलें:—

**सुधाकर**—तुझें नांव काय तें सांगितलें नाहींस ?

**लावण्य**—तुला नाहीं माझें नांव ठाऊक ? सगळे लोक तर माझें नांव घेऊनच मला हाक मारितात.

**सुधाकर**—मीं तर कोणाच्याही तोंडून तुझें नांव ऐकिलें नाहीं.

**लावण्य**—कां बरें ?

**सुधाकर**—काल तर नुकते आह्मी येथें आलों.

**लावण्य**—माझें नांव **लावण्यमयी** आहे. तुझें नांव काय ?

**सुधाकर**—माझें नांव सुधाकर.

**लावण्य**—ओहो ? काय ह्मटलेंस ? सुधाकर ! मोठें गोड नांव आहे तुझें.

**सुधाकर**—तूं मला पुन्हां भेटशील ?

**लावण्य**—हो, मी देखील तेंच ह्मणणार होतें. तूं रोज याच वेळीं येत जा. मी तुझ्या गळ्यांत फुलांची माळ करून घालीन.

**सुधाकर**— बरें तर—

**लावण्य**— आतां हात सोड मी दाई माला सांगून येतें.

असें ह्मणून ती स्वभावसरला बाला हंसत हंसत धांवत निघून गेली. बालस्वभाव सुधाकरही हळूं हळूं तेथून चालता झाला. सुधाकर जवळ येतांच प्रसन्नवदना तापसीनें कौतुकपूर्ण अंतःकरणानें त्यास कवटाळून धरिलें व त्यासह ती तेथून पलीकडच्या वाटिकेकडे निघून गेली.

---

# चतुर्थ परिच्छेद. अ. ४८

## सरलेचें दर्शन.

सरलेचा ठिकाण नाहींसा होऊन रमेशबाबूंस जरी स्त्रीविरहाचें दुःख सहन करावें लागत होतें, तरी त्यांनीं पुनश्च विवाह करण्याची गोष्ट कधीं मनांत देखील आणिली नव्हती. लोकांनीं त्यांची अनेक प्रकारें समजूत करण्याचा प्रयत्न केला; परंतु, कोणाचेंही ह्मणणें बाबूसाहेबांनीं मनास आणिलें नाहीं. आज सरला नाहींशी झाल्यास सुमारें बारा वर्षें होऊन गेलीं होतीं. इतके दिवस रमेशबाबु एकसारखे सरलेचें चिंतन करून होते. ते क्षणभर देखील सरलेला विसरले नव्हते. ज्या दिवशीं सुधाकर आणि लावण्यमयी बगीच्यांत खेळत होतीं, त्या दिवशीं काय झालें असेल तें असो; बाबूसाहेबांचें मन फारच अस्थिर झालें होतें. त्यांचें मन आजच इतकें चंचल कां झालें होतें, याचा त्यांचा त्यांनाच निर्णय करितां येईना. इतके दिवस त्यांना एकसारखें सरलेचें ध्यान लागलेलें असेंच. परंतु, आज त्यांच्या चित्तांत तिच्या स्वरूपाचा नवीन तऱ्हेनें उदय झाला.

व तेणेंकरून त्यांचें चित्त फारच विकल होऊन गेलें. जणूं काय सरलेची सुंदर छबी आज बाबूसाहेबांच्या नेत्रांसमोर वावरूं लागली होती. चित्तवृत्ति अशी चंचल झाल्यामुळें तिला किंचित् दुसरीकडे वेधविण्याच्या हेतूनें बाबूसाहेब घराबाहेर निघाले आणि इकडे तिकडे फिरून त्यांनीं सायंकाळपर्यंत कसातरी काळ काढिला. सायंकाळ होऊन रात्र पडण्याच्या बेतांत आली, तसे ते परत घरीं येऊन भोजन करून बिछान्यावर पडले व लागलींच त्यांचा डोळा लागला.

बरोबर बारा वर्षांपूर्वीं ज्याप्रमाणें ते स्वप्नांत तान्ह्या मुलाचें रडणें ऐकून जागे झाले होते, त्याचप्रमाणें आजही ते एकाएकीं चमकून जागे झाले. आणि वस्तुस्थितीचें कांहीं एक भान न राहून " प्रिये, प्रिये " ह्मणून हांका मारूं लागले. इतक्यांत जणूं कोणी तरी मधुर आणि अस्फुट स्वरानें त्यांस उत्तरही दिलें कीं " काय ह्मणतां नाथ ? "

उत्तर ऐकतांच बाबूसाहेब उसळीसरसे पलंगावर उठून बसले. दिवा गेला होता; परंतु खिडकी उघडी होती. आणि बाहेर चांदणें पडलें होतें त्यामुळें घरांत ह्मणण्यासारखा अंधेरही नव्हता. तितक्या उजेडांत बाबूसाहेबांनीं स्पष्ट पाहिलें कीं, एक रमणी हळूं हळूं दाराकडे चालली आहे. तो भाव, ती चाल, ती अंगाची ठेवण, बाबूसाहेब यावज्जीव विसरले नाहींत ! तेही पलंगावरून उठून त्या मूर्तीच्यामागें लागले. परंतु, इतक्यांत ती मूर्ति अंतर्धान पावली. ते लागलींच दाराबाहेर आले. पण मूर्ति कोठें आहे ! कां वातावरणांत गडप झाली ?

बाबूसाहेबांनीं घाबरून चाकरमाणसांस मोठमोठ्यानें हाका मारिल्या. त्याबरोबर घरांत जिकडे तिकडे एकच गडबड उडाली. बायकांनीं भीतीनें किंकाळ्या फोडिल्या. अस्तु. पुढें घरांत दिवे वगैरे लावून त्यांच्या उजेडांत सोधासोध सुरूं झाली. सर्वांनीं बाबूसाहेबांस मोठ्यानें हाका मारण्याचें कारण विचारिलें. परंतु ते कांहींएक

सांगूं शकले नाहींत. त्यांनीं जें अद्भुत स्वप्न अवलोकन केलें आणि जो अद्वितीय मंजुळ ध्वनि त्यांचे कानीं पडला, त्याच्याच विचारांत ते मग्न होऊन गेले होते. त्यांनीं आपल्या मनांतील सर्व भाव गुप्त ठेवून नोकरांस ह्मटलें:—

" घरांत बहुधा कोणी चोर शिरला असावा, चहूंकडे तपास करा " चोराचें नांव ऐकतांच स्वभावतः सर्वच लोक भयभीत झाले. आणि मग पांच चार असामी एकत्र होऊन कंदील घेऊन आंतबाहेर नीट रीतीनें पाहूं लागले. परंतु, कोठेंही चोराचा पत्ता लागला नाहीं. त्यांनीं कितीही धुंडाळलें ह्मणून त्यांना चोर सांपडणें शक्यच नव्हतें ! याच गडबडींत सारी रात्र गेली. कोणालाही निद्रासुख मिळालें नाहीं.

बाबूसाहेबांना तर झोंप येणें अशक्यच होतें. त्यांची अवस्था फारच चमत्कारिक झाली होती. डोळे मिटतांच त्यांच्या नेत्रासमोर ती मूर्ति खेळूं लागे. आणि डोळे उघडून पहावें तों कोठें कांहीं नाहीं !

---

# पंचम परिच्छेद.

## योगिनी आणि तापसी.

मागील भागांत वर्णिलेली गोष्ट घडल्यानंतर दुसरे दिवशीं एका लहानशा कुटींत दोघी स्त्रिया एकमेकींशीं गोष्टी बोलत बसल्या होत्या. एक आपली पूर्वपरिचिता **तापसी** आणि दुसरी **योगिनी** होती. **योगिनी** ह्मणाली:—" बरें मग पुढें ? "

**तापसी**—पुढें काय ? मी घरांत गेल्यावर ते जागे झाले तेव्हां तशा स्थितींत तेथें राहणें उचित न वाटून मी तेथून

निघालें. त्यांचे मनांत धांवत येऊन मला धरावें असें होतें; परंतु, मी अंधेरांत लपून गेलें. त्यांनीं गडबड करून चाकर माणसांस हाका मारिल्या. त्यामुळें घरांत त्या वेळीं जी हुलड उडाली त्या संधींत मीही तेथून पळून बाहेर निघून आलें.

**योगिनी**—तूं पळून आलीस हें तूं चांगलें केलें नाहींस. त्यांची भेट घेणेंच तुला उचित होतें.

**तापसी**—काय झालें असेल तें असो. त्यावेळीं माझें काळी-जच कांपूं लागलें. त्यामुळें त्यांच्यापुढें जाण्याचा मला धीर होईना.

**योगिनी**—अशा रीतीनें कुठवर मुकाट्यानें बसशील ?

**तापसी**—जोंवर ब्रह्मदेवानें कपाळीं लिहिलें असेल तोंवर. कपाळ-च्या रेषा कुणाच्यानें पुसवणार आहेत !

**योगिनी**—बरें. आणखीं दोन चार दिवस अशीच मुकाट्यानें ऐस. पण त्यांची भेट तर अवश्य घेतलीच पाहिजे.

**तापसी**—अग तूं वेडी तर नाहींस ? भेट न घेऊन जायचें कोठें ? शिवाय, मनोवांच्छा शेवटास नेण्यासाठीं तर येवढें साहसाचें काम केलें.

**योगिनी**—लावण्यनें तुला ओळखिलें ?

**तापसी**—ती बिचारी काय ओळखणार ?

**योगिनी**—मी पाहतें तों सुधाकर आणि लावण्य यांच्यामध्यें मोठेंच प्रेम वाढत चाललें आहे ! दोघेंजण जेव्हां या बगी-च्यांत खेळतांना दृष्टीस पडतात, तेव्हां मनाची अशी खात्री पटते कीं, परमेश्वरानें हा फारच सुंदर जोडा जम-विला आहे.

**तापसी**---देवाच्या दयेनें सर्व काहीं—

**योगिनी**---बरें तें असो. पण मी ह्मणतें, तूं त्यांना कांहींच कसें कळविलें नव्हतेंस? तूं मला सुधाकार दिलास आणि त्यानंतरही चांगलीं दोन वर्षे तूं घरांत होतीस. इतक्या काळांत एक दिवस देखील तूं या संबंधांत त्यांच्याशीं बोलली नाहींस ?

**तापसी**—तूं जेव्हां सुधाकरास घेऊन आलीस, तेव्हां मी मुळीं भानावरच नव्हतें. मागून मला कळलें कीं, जन्मतःच मूल मेलेलें झाल्यामुळें सुईण त्यास घेऊन गेली. पण तूं मला सांगितलें होतेंस कीं, मी मुलास घेऊन जाईन ह्मणून. त्यामुळें मनांत किंचित् आशा होती. लोकांनीं तर सगळ्यांनीं सांगितलें कीं, मेलेलेंच मूल झालें होतें. झालें. पुढें त्या दिवसापासून तुझीही गांठ पडेनाशी झाली. त्यामुळें मी अगदींच निराश होऊन गेलें. मग तुझी माझी जी आणभाक आणि बोलणें झालें होतें तें त्यांना माझ्यानें सांगवेना.

**योगिनी**—तूं मला दिलेलें वचन मात्र विसरून जाऊं नको.

**तापसी**—ती गोष्ट मी कशी बरें विसरेन ! तूं माझ्या हृदयरत्नास परत दिलेंस, तर आतां मीं तुला दिलेलें वचन विसरणें देवाच्या घरीं न्यायाचें ठरेल काय ? पण तुमचा समग्र वृत्तांत जाणण्याची मला फार उत्कंठा लागली आहे.

**योगिनी**—तशी जर वेळ आली, तर अवश्य सांगेन.

**तापसी**—आतांच कां नाहीं सांगत ?

**योगिनी**—छे, आतांच नाहीं सांगणार. अजून तशी वेळ आली नाहीं.

**तापसी**—बरें तर या विषयासंबंधानें मीही विशेष आग्रह करीत नाहीं.

**योगिनी**—तूं आतां आपल्या पतीला अवश्य भेट.

**तापसी**—मीही तेंच इच्छितें. परंतु कोण जाणें माझें काळीज इतकें कां कांपतें ? न जाणो इतके दिवस मी—

**योगिनी**—अँ हँ, ते तुझी निर्भर्त्सना करून तुझा अव्हेर करतील होय ? तसें व्हायचें नाहीं. त्यांनीं तुझी समग्र हकीकत ऐकिल्यावर तुझी ते कधीं निंदा करणार नाहींत. उलट तुझी प्रशंसाच करतील.

**तापसी**—तर मग आजच त्यांना भेटेन; मग कांहींही होवो.

**योगिनी**—( हंसून ) पहा बरें, आजही भीतीनें पळून मिळून येशील एखादी !

**तापसी**—नाहीं, नाहीं. रोजच्या रोज काय—

याप्रमाणें संभाषण झाल्यावर योगिनी आपल्या कामाकरितां अरण्यांत गेली आणि तापसी कुटीमध्यें बसल्या बसल्या कांहीं एका प्रकारच्या चिंतेंत मग्न झाली.

## षष्ठ परिच्छेद.

### योगिराज.

तापसीचा निरोप घेऊन योगिनी निघाली, ती गांवाची हद्द सोडून आणि मधल्या प्रदेशासही ओलांडून एका अत्यंत सघन श्वापदपूर्ण आणि भयंकर जंतुविहीन अरण्यांत गेली. तो ऐन दुसऱ्या

प्रहाराचा समय होता. आदित्यदेव अंतरिक्ष मार्गातून प्रखर किरणांचा वर्षाव करीत होता. त्या भयंकर सूर्यतापानें विकल होऊन पक्षिसमुदाय तरुकोटरांत आणि शीतल वृक्षपर्णसमुदायांत लपून बसला होता. पशूंचे कळप क्लांत होऊन विस्तीर्ण वृक्षांच्या घनदाट छायेंत बसून रवंथ करीत होते. त्या वनांत कोठेंही मनुष्यचिन्ह दृष्टिगोचर होत नव्हतें; केवळ ती एकटी योगिनी—प्रौढा त्रिंशत्वर्षीया रूपवती योगिनी—त्या वेळच्या प्रखर सूर्य-तेजास न जुमानतां तीव्र वेगानें जमीन तुडवीत अरण्याच्या ऐन मध्यभागीं जाऊन पोंचली.

त्या ठिकाणीं एक प्रकांड वटवृक्ष आपल्या शाखा प्रशाखा विस्ता-रून आणि आपलें डोकें उंच करून जणूं अरण्याची शोभाच अव-लोकन करीत आहेसा दिसत होता. त्याच्या खालीं दोन चार गाई आणि म्हशी अर्धवट निजल्यासारख्या स्वस्थ पडल्या होत्या. एक कुत्रा जीभ बाहेर काढून धापा टाकीत बसला तोता. वरतीं असंख्य पक्षी पर्णछायेंत बसून मंदस्वरानें किलकिलाट करीत होते. त्या स्थळीं योगिनी जातांच तेथील शांततेचा भंग झाला. गाईनीं आपल्या आलस्य-पूर्ण नेत्रांनीं योगिनीस पाहून आपलीं अंगें झाडिलीं. कुत्रा कुशीस वळून जीभ हालवीत उभा राहिला. पक्ष्यांनीं चकित होऊन किलकिलाट बंद केला. योगिनीनें या मनोरम देखाव्याकडे दृष्टिक्षेपही केला नाहीं. लक्ष्य-पूर्वक वृक्षाग्रभागाकडे अवलोकन करून तिनें मोठ्यानें "योगिराज, योगि-राज" म्हणून हाक मारिली.

ती हाक ऐकून त्या प्रचंड वृक्षाच्या घनदाट पर्णसमुदायांतून निघून एक ऱ्हस्वाकृति पुरुष खालीं उतरला.

त्या पुरुषाचा पेहराव मोठा चमत्कारिक मोता. त्याचे केश लांब असून त्याची दाढी त्याच्या हृदयावर रुळत होती. नेत्र लाल, मुखा-कृति भयानक, केश रुक्ष, शरीर कृश, आणि वस्त्रें मलिन होतीं. हातांत पांच हात लांबीची कळकी काठी होती. एकंदरींत त्याला पहातांच

मनुष्याचे मनांत भीति उत्पन्न व्हावी असा त्याचा वेष होता.

परंतु योगिनीला त्याच्या दर्शनापासून यत्किंचित् देखील भय न वाटतां ती त्याचा हात धरून मोठ्या प्रेमादरानें त्याशीं बोलूं लागली. ती किंचित् विनोदयुक्त स्वरानें हंसून ह्मणाली:—

" वा: लोकांना पलंगावर झोंप येत नाहीं ! आणि तुह्माला झाडाच्या खांदीवर झोंप येते. आश्चर्य ! "

**योगिराज**— लोक सुखी नसतात आणि मी सुखी आहें.

**योगिनी**— सुख कशाचें ! तें आपलें तुह्मी मानून घ्यावयाचें इतकेंच. वस्तुत: अरण्यांत राहण्यानें तुह्माला किती दु:ख सहन करावें लागत असेल ही गोष्ट मनांत आली ह्मणजे माझें पोटांत कसें कालवूं लागतें. पण करावयाचें काय ? भगवंताची इच्छा !

**योगिराज**— आतां दु:ख कशाचें ? ज्याला सर्व कांहीं अनुकूल होतें, ज्याच्या भयानें सारा देशच्या देश कांपत होता, ज्याच्या अन्नावर शेंकडों लोकांचें जीवरक्षण होत होतें, त्याला आतां दु:ख कसलें ? प्रिये, मला कसलेंही दु:ख पूर्वीं नव्हतें आणि आतांही नाहीं. फक्त तुझें दु:ख पाहून मात्र हृदय विदीर्ण होऊन जातें !

**योगिनी**— चांगलीं सोळा सत्रा वर्षें होऊन गेलीं, अजूनही तुह्मांला पकडूं शकतील ? आतां कां नाहीं घरीं चलत ? मला जें काय मिळेल तेवढ्यांत चांगल्या रीतीनें दोघांचा निर्वाह होईल.

**योगिराज**— इंग्रजांच्या राज्यांत अगोदर दोषाची क्षमा नाहीं. आणि प्रसंगोपात्त दोषी असेल तो निर्दोषी आणि निर्दोषी असेल तो दोषी ठरण्यासही चुकत नाहीं ! आह्मी गोपाळपुरचे मुख्य जमीदार असून दंग्याचे वेळीं कित्येक दरवडेखोरांस बंदुकीच्या गोळ्यांखालीं जेर करून वठणीस आणिलें. असें असतां आह्मांला इनाम किताब मिळणें तर एकीकडेसच राहिलें ! उलट आह्मांसच दोषी ठरवून सरकारानें आमची चेहरेपट्टी लावून आह्मांस पकडून देण्याबद्दल

इनाम लाविलें आहे ! अद्याप गुप्तपोलीस आमच्या शोधांत आहेच. आह्मी केवळ ईश्वरकृपेनेंच अद्यापपर्यंत या अरण्याचा आश्रय करून वाचलों आहोंत. प्रिये, पन्नास वर्षांनीं जरी आह्मी त्यांचे हातीं लागलों तरी ते आह्मांस दोषी ठरवून फांशी तरी देतील नाहींतर यावज्जीव काळें पाणी ! अतएव आह्मांस एकांतवासच करणें उचित आहे.

**योगिनी**—अँः आतां तुह्मांला कोण ओळखणार आहे. तुमच्या पूर्वीच्या रूपापैकीं आतां काय राहिलें आहे ? तुह्मी तर आपलें रंगरूप सर्वस्वीं बदलून टाकिलें आहे.

हें भाषण योगिनी अशा प्रेमभावानें आणि कांपत कांपत बोलली कीं, तें ऐकून योगिराजाचें हृदय आर्द्रतेनें भरून आलें. त्यानें दीर्घ श्वास सोडून ह्मटलें " प्रिये, शहरांत येऊन आतां सुखाची अशा कोठली ! "

**योगिनी**—नाथ, सुखाची आशा तर कधींच सोडून बसलें आहें.

**योगिराज**—मग काळजी कशाची ? बरें पोरगी कशी आहे ?

**योगिनी**—ती चांगली खुशाल आहे.

**योगिराज**— एक वेळ तिला पाहण्याची फार इच्छा आहे.

**योगिनी**— मग चलाना ? तीं दोघें या वेळीं बागेंत खेळत असतील.

**योगिराज**—तूं जर रमेशबाबूंच्या मुलाला न वांचवितीस, तर आपल्या कन्येचें लग्न देखील झालें नसतें. कारण तूं तर आपली किंवा माझी ओळखही कोणास देऊं शकली नसतीस. मग अज्ञातकुलशीला योगिनीच्या मुलीशीं कोण लग्न लावता ?

असें ह्मणून योगिराजानें एक दीर्घ श्वास सोडिला. योगिनीनेंही त्याच्या प्रमाणेंच दीर्घ सुस्कारा सोडून ह्मटलें " सगळी जगदीशाची इच्छा आहे. मग चलतांना ? "

**योगिराज**—छे प्रिये, आज तर नाहींच येत. काय असेल तें

असो, आज माझ्या मनांत अनेक भयतरंग उठताहेत !

**योगिनी**—तर मग पुन्हां केव्हां याल ?

**योगिराज**—जाणते तर आहेस कीं, मी येथपर्यंतच आपला प्राण मुठींत घेऊन येतों.

**योगिनी**—तें सर्व मी जाणतेंच आहे. पण मला एकदां बरोबर दिवस सांगा.

**योगिराज**—एक महिन्यानंतर आजच्याच दिवशीं येईन.

**योगिनी**—तुह्मी आमच्या कुटीपर्यंत कां येत नाहीं ? मी लावण्यला तेथेंच घेऊन येईन.

**योगिराज**—जमल्यास मी तेथपर्यंत येईन. नाहीं तर तूं तेथपर्यंत ये.

**योगिनी**—हे घ्या मी पन्नास रुपये आणिले आहेत.

योगिराजानें व्यग्रतापूर्वक रुपये घेऊन ह्मटलें:—

" प्रिये, तूं आमची गृहलक्ष्मी आहेस ! देवा, मला मरण कां येईना ! मरण पावलों ह्मणजे ही असह्य पीडा नाहीं भोगावी लागणार ! "

**योगिनी**—नाथ, हें काय बरें असें बोलतां ! मी तर तुमची दासी चिरदासी आहे. दासीनें नाहीं सेवा करावयाची तर कोणी ?

योगिनीचें हें भाषण श्रवण करून योगिराजाच्या चित्तांत एक दारुण आघात झाल्यासारखें झालें. तो पुन्हां एक अक्षर देखील बोलला नाहीं. उलट तेथून मोठ्या त्वरेनें चालता झाला. जेथपर्यंत तो दृष्टीस पडत होता तेथपर्यंत योगिनी त्याचेकडे पापणी न हालवितां पहात होती. नंतर एक दीर्घ निश्वास सोडून तीही तेथून निघाली.

# सप्तम परिच्छेद.

---

## सुधाकर आणि लावण्य.

पूर्वी वर्णन केलेल्या बगीच्यांत लावण्यमयी आणि सुधाकर पहिल्या दिवशींच्या भेटीपासून नियमानें एकमेकांस भेटून अनेक प्रकारच्या बालक्रीडांत मग्न होत असत. द्वादशवर्षीया सरलस्वभाव बालिका लावण्य जरी अद्याप पूर्णपणें अज्ञातयौवना नव्हती, तरी पण तिच्या ठायीं एक प्रकारचा नेणतेपणाच वास करीत होता, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. आणि सरलहृदय सुधाकर सोळा वर्षांचा तरुण असतांही पाशववृत्ती-विषयीं अर्थात् विषयवासनेच्या संबंधांत अजाणच होता. त्या दोघांचें स्वच्छ अंतःकरण केवळ स्वर्गीय अकपट भावानें भरलें होतें. त्यांत सरलतेबरोबर माधुर्य, सुंदरतेबरोबर सौजन्य आणि प्रेमविकाराबरोबर प्रीति, तशींच क्रीडेबरोबर व्रीडा आणि लीलेसह ऐक्य वास्तव्य करीत होतें. दोघांची अकपट आणि शुद्ध प्रीति स्वर्गीय भावानें भरलेली आणि भोव्या वृत्तीनें डवरलेली होती. दोघांनाही एकमेकांचें कुलशील माहीत नव्हतें. परंतु, नैसर्गिक प्रीतीची अशी कांहीं विचित्र आणि आश्चर्यजनक गति आहे कीं, ती सदां प्रेमी मनुष्यांना सरळ आणि योग्य मार्गावरच घेऊन जाते. प्रीतीमध्यें कधीं कधीं अंतरायही येतात, नाहीं असें नाहीं. परंतु, त्या संबंधानेंही आह्मी असेंच ह्मणणार कीं, तेथें कदाचित् नैसर्गि-कतेचा अभाव असेल. त्याशिवाय प्रीतींत अंतराय यावयाचा नाहीं. कारण नैसर्गिक प्रीतीच्या वातावरणांत विरुद्ध वर्तनाचें वादळ उत्पन्न होत नसतें.

आज आह्मी त्या दोघां भोळ्या आणि प्रेमळ जोडीच्या संभाषण-

कौतुकांचें एक स्वर्गरमणीय चित्र वाचकांचे पुढें ठेवीत आहोंत. भुक्तभोगी वाचक सहजच त्याचें छायाचातुर्य ओळखतील !

एका बकुलवृक्षाच्या शीतळ छायेंत स्वच्छ आणि सुंदर शिलातलावर बसून लावण्य आपल्या कोमल हस्तांनीं ताज्या तोडून आणिलेल्या सुवासिक रंगींबेरंगी फुलांचे हार, गजरे, गुच्छ आणि इतर अलंकार गुंफीत होती. ती आपल्या आवडीप्रमाणें फुलांचे रंग लावून एकेक फूल गुंफीत असतां तोंडानें मृदुमधुर स्वरांत कित्येक गाण्यांचीं पालेपदें घोळीत होती.

इकडे सुधाकरही कित्येक रंगाच्या फुलांनीं आपली ओटी भरून तिच्यामागें मुकाट्यानें येऊन उभा राहिला. परंतु लावण्य आपल्या कामांत अगदीं गढून गेली असल्यामुळें त्याजकडे तिचें लक्ष्यच गेलें नाहीं. मग थोडक्याच वेळांत सुधाकरानें आपल्या कोमल हस्तांनीं तिचे डोळे धरिले आणि ते कोणी धरिले हें तिनें ओळखण्याविषयीं आपली इच्छा प्रदर्शित केली.

लावण्यनें तेव्हांच त्याचे हात ओळखून ह्मटलें " सुधाकर, सुधाकर, दुसरें कोणी नाही ! चल सोड आतां, मी का तुझे हात ओळखीत नाहीं वाटतें ? सोड, माझे डोळे दुखूं लागले. "

मग सुधाकर पुढें येऊन ह्मणाला " ही पहा मीं तुझ्यासाठीं किती फुलें आणिलीं आहेत. "

सुधाकरानें लावण्यमयीचे पुढें चित्रविचित्र फुलांची रास आणून घातली. ती पाहून लावण्य अत्यंत प्रसन्न होऊन सुधाकराचा हात धरून ह्मणाली " बस खालीं, उभा कां ? ये माझ्याजवळ बैस. "

**सुधाकर**— इथें इतकी जागा कुठें आहे ?

**लावण्य**— ओः पुष्कळ आहे.

असें ह्मणून तिनें सुधाकराचा हात धरून त्यास आपलेजवळ बसवून घेतलें.

**लावण्य**—हे पहा तुझ्याकरितां किती हार गुंफले आहेत. पहा तर खरे कसे आहेत ते.

**सुधाकर**—खरेंच फारच चांगले झाले आहेत. आतां मी तुझ्याकरितां एक जाळी गुंफतों.

**लावण्य**—नको, नको, माझ्याकरितां नको गुंफायला.

**सुधाकर**—वाः नको कशी ?

असें ह्मणून दोघेंही फुलें गुंफण्यांत निमग्न झालीं. तेव्हां सुधाकरानें हंसून ह्मटलें " काग लावण्य, तूं माझ्याबरोबर लग्न करशील? "

**लावण्य**—हो, करीन. लग्न ह्मणजे काय असतें कोण जाणें ! ! पण त्याचें नांव घेतलें कीं, माझें मन कसें प्रसन्न होतें. होय तुझ्याबरोबर मी लग्न करीन.

**सुधाकर**—आणखीं तुझ्या बाबांनीं दुसऱ्या कोणाशीं करून देण्याचें ठरविलें तर?

**लावण्य**—छे रे! मी तर बाबांची अगदीं लाडकी आहे. मी जें मागेन तें ते मला देतात. आणि मी सांगेन तसें करितात. मग मी ह्मटलें तर तुझ्याबरोबर ते माझें लग्न नाहीं का करून देणार ?

**सुधाकर**—तूं असली लाजेची गोष्ट बाबांच्याजवळ बोलशील ?

**लावण्य**—यांत कसली लाज? लग्नामध्यें कुठें लाज असते? बरें पण तूं माझ्या घरीं कां नाहीं चलत?

**सुधाकर**—नाहीं कां? जेव्हां लग्न होईल तेव्हां येईन.

**लावण्य**—तर मग मी बाबांना सांगेन कीं, सुधाकराशीं माझें लवकर लग्न करून द्या. ह्मणजे तुला माझ्या घरीं लौकर यायला सांपडेल.

**सुधाकर**—बरें लावण्य, कदाचित् बाबांनीं दुसऱ्याबरोबर तुझें लग्न करून दिलें, तर तूं काय करशील?

**लावण्य**— (गर्वानें ) नाहीं, नाहीं, ते असें कधीं करणार नाहींत.

सुधाकर—जर कदाचित् केलेंच तर ?

लावण्य—तर मी आपला प्राण देईन.

सुधाकर—प्राण देण्यापेक्षां मुकाट्यानें मजबरोबर पळून येशील तर चांगलें होईल.

हें ऐकून लावण्य क्षणभर स्तब्ध झाली. मग पुन्हां उदास होऊन ह्मणाली:—

" बाबांना कसें सोडूं ? "

सुधाकर—तर मग दुसरा उपाय काय ?

लावण्य—बाबा माझ्या मनाविरुद्ध खास करणार नाहींत—

पुढें दोघांनीं एकमेकांच्या गळ्यांत फुलांचे हार घातले व एकमेकांस गजरे दिले. त्या वेळचें लावण्यमयीचें अपूर्व रूप वर्णन करण्यास आमची लेखणी असमर्थ आहे. दोघेंही एकमेकांस कडकडून भेटलीं व घरीं जावयास निघालीं. कारण, संध्याकाळ होऊन अगदीं रात्र पडण्याच्या बेतांत होती.

लावण्य—उद्यां पुन्हां लौकर ये बरें.

सुधाकर—येईन बरें, लौकर येईन.

इतकें बोलणें झाल्यावर दोघेंही आपापल्या घराकडे वळलीं.

## अष्टम परिच्छेद.

### सरला भेटली.

एके दिवशीं रात्रीं रमेशबाबू निद्रावश झाले असतां त्यांना पूर्वीप्रमाणेंच एक स्वप्न पडलें. त्यांनीं स्वप्नांत पाहिलें कीं, जणुं सरला त्यांचेजवळ येऊन त्यांचे पाय धरून रडत आहे आणि अतिशय विनवण्या करून त्यांची क्षमा मागत आहे. तसेंच फार

दिवसांनीं आपली स्त्री आपणांस भेटलेली पाहून बाबूसाहेबांचें हृदयही दाटून फुटण्याच्या बेतांत आलें आहे आणि नेत्र अश्रूंनीं भरून आले आहेत. त्यांनीं एक दीर्घ निश्वास सोडला व त्यासरसे ते जागे झाले ! तेव्हां त्यांस समजून आलें कीं, आपण एवढा वेळ जें कांहीं पाहिलें किंवा ऐकिलें तें सर्व स्वप्नगत होय ! परंतु त्याच वेळीं आपल्या पायावर दोन कढत अश्रुबिंदु गळाल्याचा त्यांना भास झाला. त्यांनीं शंकानिरसनार्थ हातांनीं चाचपून पाहिलें, तों ते खरेच अश्रुबिंदु आहेत असें त्यांस समजलें. व पायगतचे बाजूकडून रडण्याचा हुंदकाही त्यांचे कानीं आला. एकदम त्यांचें हृदयांत भय, विस्मय आणि आश्चर्य या तिन्ही विकारांचा उद्भव झाला. त्यांनीं जोरानें पुसलें " कोण आहे? " तेव्हां पूर्ववत् अश्रुबिंदु मात्र त्यांच्या पायावर गळाले. परंतु उत्तर मिळालें नाहीं. बाबूसाहेब अजूनही स्वप्नच पहात आहेत काय? ते चमकून उठले आणि पुन्हां ह्मणाले " कोण आहे ? " त्यांस उत्तर मिळालें नाहीं. परंतु आंतल्या आंत हुंदके देऊन कोणी तरी रडत आहे एवढी गोष्ट मात्र त्यांस खास पटली. ते चटकन् उठून उभे राहिले व दाराकडे वळले. अलीकडे ते फार भित्रेपणानें वागत असत. भुताखेतांच्या अस्तित्वावर त्यांचा विशेषसा विश्वास नव्हता. तथापि अलीकडे जे त्यांना चमत्कारिक भास होत, त्यांसंबंधानें त्यांचें मन सदा शंकित असे. ते दाराजवळ जाऊन तें उघडण्याच्या बेतांत होते; इतक्यांत कोणी जवळ येऊन त्यांचा हात धरिला. अगोदरच त्यांची वृत्ति सदा शंकित असे आणि त्यांत अंधारांत त्यांना कोणीं कोमल हस्तांनीं येऊन धरिलें ! मग काय, त्यांची जी धांदल उडाली ती वर्णन करितां येणें कठिण आहे. ते घाबरून अगदीं ओरडण्याच्या बेतांत होते. इतक्यांत जिनें आपल्या कोमल हस्तांनीं त्यांना हात धरिला होता ती स्त्री अत्यंत करुणायुक्त वाणीनें त्यांस ह्मणाली

" नाथ, मला ओळखलें नाहीं काय ? मला विसरलां वाटतें ? "

दहाबारा वर्षांपासून सरलेचा पत्ता नव्हता. परंतु पति कधीं पत्नीचा स्वर ओळखणार नाहीं काय ? इतक्या दिवसांनीं बाबूसाहेबांस पूर्ववत् कोमल स्वर ऐकावयास सांपडला. तो आपल्या प्रेमळ पत्नीचा स्वर ओळखून बाबूसाहेब आश्चर्यचकित झाले आणि ह्मणाले " कोण—तूं ? "

**सरला**—होय नाथ !

**रमेशबाबू**—अहाहा प्रिये, इतके दिवस कोठें होतीस ? हाय हाय, आह्मांला न सांगतां आणि न पुसतां कोठें गेली होतीस ? एकवेळ देखील परत आह्मांस भेटण्याची तुला इच्छा झाली नाहीं काय ?

**सरला**—( दोन्ही हातांनीं बाबूसाहेबांचा हात धरून ) नाथ, दासीचा अपराध पोटांत घाला ! खरोखर माझा समग्र वृत्तांत ऐकल्यावर आपण मजवर कोप करणार नाहीं अशी माझी खात्री आहे.

**रमेशबाबू**—प्रिये, मी कोठें तुजवर कोप करितों आहे ? मला का तुझ्या शुद्धाचरणाची खात्री नाहीं होय ? तूं जरी आह्मांस न विचारतां निघून गेलीस, अथवा आह्मांस अगाध विरहसागरांत लोटून अंतर्धान पावलीस आणि एक महिन्याचें तान्हें लेंकरूं आमच्या शिरावर आणून ठेविलेंस, तरी देखील आह्मी तुजवर कोप केला नव्हता ! कारण तुझ्या निर्मल चरित्राविषयीं आह्मांस यत्किंचित् देखील संदेह नव्हता. तशांत तूं पुन्हां येथें येऊन आपल्या अस्तित्वानें सारें गृह प्रकाशित केलेंस, तेव्हां हा का तुजवर कोप करण्याचा समय आहे बरें ?

**सरला**—दासीला अशाविषयीं विश्वास नसता तर कदापि परत घरीं आलें नसतें.

**रमेशबाबू**—बरें थांब मी दिवा लावतों.

**सरला**—नाथ, तें आपलें काम नव्हें, दासी हजर आहेच.

आपण थांबा, मीच आपल्या हातानें दिवा लावून आपलें मुखकमल डोळे भरून अवलोकन करितें !

असें ह्मणून आपल्या पूर्वपरिचिता तापसीनें—प्रस्तुत सरलेनें बाबूसाहेबांस जागा विचारून आगपेटी सोधिली आणि काडी ओढून दिवा लाविला. अंतःपुर प्रकाशमय होतांच बाबूसाहेबांनीं पाहिलें तों तापसीवेषांत स्वर्गीय देवतेप्रमाणें शोभणारी सरला त्यांचे समोर सलज्ज मुद्रेनें उभी आहे. सरलेची त्या वेळची छबी कोणाही मनुष्याच्या मनांत पूज्यभाव उत्पन्न करणारी होती. तिजला पाहून क्षणभर बाबूसाहेब तर स्तंभित होऊन गेले. मग कांहीं वेळानें त्यांनीं तिला घट्ट आलिंगन देऊन तिच्या कोमल कपोलांचें अनेक वार चुंबन घेतलें. खरोखर तिच्या शीतल अंगस्पर्शानें बाबूसाहेबांचा विरहताप एकदम शांत झाला ! तो पहिला प्रेमावेश कमी झाल्यावर दोघेंही मंचकावर बसून एकमेकांशीं संभाषण करूं लागलीं. इतक्या दिवसांच्या सांचलेल्या गोष्टी काय एका रात्रींत संपणाऱ्या होत्या ! आणि त्यांतून कोणत्या अगोदर काढावयाच्या आणि कोणत्या मागून ? ! प्रथम कोणीं बोलावयास प्रारंभ केला, हें सांगतां गेणें कठिण आहे. गोष्टींना तर शेवट नव्हताच; पण अखेरीस सरला ह्मणाली " प्रियतम, मी इतके दिवस कोठें होतें आणि आपणांस न पुसतां सवरतां संसारसुखाचा त्याग करून कां गेलें, या संबंधानें आपली अनुमति असेल तर सांगतें. "

**रमेशबाबू**—प्रिये, पुष्कळच गोष्टी तुला विचारायच्या आहेत. त्यांतली पहिल्यांदा कोणची विचारूं आणि मागून कोणची विचारूं याचाच मला उमज पडत नाहीं. माझी तर मति कशी अगदीं गुंग झाल्यासारखी झाली आहे. याकरितां तुला जसें सुचेल तसें तूं सांग आणि मी ऐकतों.

याप्रमाणें बाबूसाहेबांचें भाषण ऐकून सरला त्यांचे सन्मुख

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

बसून अपला वृत्तांत सांगूं लागली. ती ह्मणाली “ मला जेव्हां पहिल्या वेळीं मूल होऊन तें लागलींच गतप्राण झालें, तेव्हां तुह्मी संततीच्या प्राप्तीसाठीं मजकडून अनेक तऱ्हेचे उपाय करविले. मींही पुष्कळशा औषधी सेवन केल्या. परंतु त्यांचा कांहीं उपयोग झाला नाहीं. शेवटीं आपण दोघेंही निराश झालों. लोक तुह्मांस दुसरें लग्न करण्याविषयीं आग्रह करूं लागले. मींही त्याबद्दल आपली सम्मति देऊन पुष्कळ समजूत घातली. परंतु आपण त्या गोष्टीस कबूल झालां नाहीं. त्यामुळें माझ्या मनास फारच वाईट वाटूं लागलें. एके दिवशीं आपल्या वाड्याच्या मागील बागेंत मला एक **योगिनी** भेटली. तिच्याशीं सुखदुःखाच्या गोष्टी बोलतां बोलतां मीं आपली समग्र दुःखाची कहाणी तिला सांगितली. त्यावर मोठ्या खात्रीपूर्वक स्वरानें ती ह्मणाली “ माझ्याजवळ एक मुळी आहे, तिच्या सेवनानें मूल होऊन तें जगतेंही. परंतु, त्यांत अशी एक गोम आहे कीं, त्या मुलाची आईच जर त्याचें लहानपणीं पालन करील तर मात्र तें मूल जगावयाचें नाहीं. ” त्यावर मीं ह्मटलें “ मग मी काय करूं ह्मणतेस ? ” ती ह्मणाली “ मी याच गांवांत रहात असतें. तूं माझ्या मुळीचें सेवन कर ह्मणजे तुला गर्भ राहील. मग तुला जेव्हां प्रसूतिवेदना होऊं लागतील, तेव्हां मला बोलावणें पाठीव. मी तुझ्या मुलास घेऊन जाऊन त्याचें नीट रीतीनें पालन करीन. तो मोठा होऊन चांगला जाणता झाला, ह्मणजे त्याला कोणत्याही प्रकारचें भय राहणार नाहीं. मग तूं त्यास परत घेऊन ये. ” तिचें ह्मणणें कबूल करून मीं तिनें दिलेल्या मुळीचें सेवन केलें. त्या दिवसापासून रोज तिची माझी भेट होत असे. यथाकालीं माझे पोटांत गर्भ राहून प्रसूतिसमय येऊन पोहोंचला. तुह्मांला आठवत असेलच कीं, मीं आपली नेहमींची सुईण सोडून तिच्या ऐवजीं एक नवीनच सुईण बोलाविली होती ? ती सुईण ह्मणजे

मीं सांगितलेली योगिनी होय. पुढें मला मुलगा होऊन तो मेलेला झाल्याचा बहाणा करून ती त्या मुलास घेऊन गेली. त्या वेळचा सर्व प्रकार आपणांस आठवत असेलच. "

**रमेशबाबू**— खरेंच, तो सर्व प्रकार मला आठवतो.

**सरला**— त्यानंतर चारपांच वर्षे होऊन गेलीं, तरी मला योगिनी भेटेना ! त्यामुळें त्या मुलासंबंधानेंही मी अगदीं निराश होऊन गेलें. मग आपल्याला ती हकीकत सांगण्याचें धैर्य कोठून होणार ? पण एके दिवशीं मी अगदीं चिंताक्रांत होऊन गेलें असतां, एकाएकी मला योगिनीची भेट झाली. मीं लागलीच तिला बालकाचा वृत्तांत विचारिला. ती ह्मणाली " काळजी करूं नको, तो जिवंत असून खुशाल आहे. पण एक गोष्ट करशील तर तो तुला दाखवितें. " मीं ह्मटलें " काय करूं ?' ती ह्मणाली, " कांहीं विशेष नाहीं. तूं आज रात्रीं माझ्याबरोबर चल. मी एक महिन्याची एक तान्ही मुलगी तुजपाशीं देईन. तिला घेऊन तूं मुकाट्यानें आपल्या पतीच्या बिछान्यावर ठेवून परत ये. ती माझी स्वतःची कन्या आहे. मी तुझ्या मुलाचें पालन करीत असल्यामुळें माझ्यानें त्या मुलीचें पालन होऊं शकत नाहीं. मी अगदीं गरीब आहें. तुझा पति त्या मुलीचें अवश्य संगोपन करील.

**रमेशबाबू**— मग पुढें ? पुढें काय झालें ?

**सरला**— पुढें ती आणखीं असेंही ह्मणाली कीं, मी इतक्या काळजीनें तुझ्या मुलाचें पालन पोषण करीत आहें. तर तो तुला परत मिळाल्यावर त्याबद्दल तूं मला काय देशील ? मीं चटकन् प्रतिज्ञापूर्वक तीस ह्मटलें " जें तूं मागशील तें मी तुला देईन. " ती ह्मणाली " मी जास्त कांहीं मागत नाहीं. तूं आपल्या मुलाशीं माझ्या कन्येचें लग्न करून घेण्याचें कबूल करून त्याबद्दल फारसा बभ्रा न करण्याचें वचन देशील तर तुझा मुलगा मी तुला आणून दाखवितें. " मी त्यावेळीं मुलगा पहाण्याविषयीं केवळ वेडी बनलें होतें,

त्यामुळें मीं तत्काळ तिचें ह्मणणें कबूल केलें. त्याच दिवशीं रात्रीं बारा वाजतां ती आपल्या कन्येस घेऊन मजकडे आली. मींही तिची वाटच पहात बसलें होतें. त्यानंतर त्या कन्येस तुमच्याजवळ ठेवून मी घरांतून चालती झालें.

**रमेशबाबू**— मग ?

**सरला**— मग मी तिच्याबरोबर एका कुटींत जाऊन पोहोंचलें. तेथें एक पुरुष मुलाला मांडीवर घेऊन खेळवीत होता. योगिनीनें तो मुलगा माझे स्वाधीन केला. मीं मोठ्या प्रेमानें त्या मुलास कंवटाळून त्याचे अनेक वेळ मुके घेतले. त्याला पहातांच मला खास वाटलें कीं, हें आपलेंच बालक आहे.

**रमेशबाबू**— ( आतुरतेनें ) प्रिये, मग तो मुलगा आतां कोठें आहे ?

**सरला**— जरा धीर धरा, सगळें सांगतें. त्यानंतर तो पुरुष ह्मणाला "येथें आह्मांस फार वेळ थांबतां येत नाहीं. पोलिसास आमचा पत्ता लागला आहे." त्यावर योगिनी मला ह्मणाली "भगिनि, तूं आतां घरीं जा. तुझ्या मुलाचें मी यथायोग्य परिपालन करीन. तूं माझ्या कन्येचें रक्षण कर. वेळ आली ह्मणजे मी स्वतां तुझ्या मुलाला घेऊन येईन. पण लक्षांत ठेव बरें लग्नाची गोष्ट तुला माघारी घेतां यावयाची नाहीं." प्राणनाथ, त्या वेळीं मुलगा माझी मांडी सोडून कोणत्याही उपायानें त्यांचे जवळ जाईना ! त्याची द्विधा बुद्धि झाली असावी. कारण तो योगिनीचा पदर धरून शिवाय मलाही सोडिना. त्यावेळीं खरोखर माझ्या बुद्धीला भ्रंश पडला आणि एखाद्या मंत्रानें भारलेल्या सर्पाप्रमाणें मी त्यांच्या मागोमाग फिरूं लागलें.

योगिनीनें मला पुष्कळ वेळा वारिलें. परंतु, मीं तिचें कांहीं एक ऐकिलें नाहीं. अकरा बारा वर्षे एकसारखीं त्यांच्या बरोबर

अनेक तीर्थयात्रा करीत भ्रमण करीत होतें. येथें परत आल्यास सारा एक महिना झाला. तेव्हांपासून आपल्या भेटीची इच्छा करीत होतें. परंतु, भीतीमुळें धैर्य होईना. एके दिवशीं रात्रीं मुकाट्यानें अंतःपुरांत आलें होतें. पण आपण जागे झालेले पाहून भयानें पुन्हां पळून गेलें.

वरील हकीकत ऐकल्यावर बाबूसाहेबांनीं मोठ्या उत्कंठेनें तीस ह्मटलें " प्रिये, झालें तें ठीक झालें. परंतु, तें माझें हृदयरत्न कोठें आहे ? "

सुधाकर आपल्या आईबरोबरच आला होता; परंतु, तिच्या सूचनेवरून तो बाहेर उभा राहिला होता. त्याला सरलेनें हाक मारिली " बेटा सुधाकर "

तत्क्षणीं सुधाकर दाराजवळ आला आणि सरलेनें त्यास आंत बोलाविलें. बाबूसाहेबांच्यानें धीर धरवेना ! त्यांनीं धांवत जाऊन त्याला कंवटाळून धरिलें. इतक्यांत सकाळ झाली. घरांतील सर्व माणसांनीं सरला आलेली पाहून आणि तिची सर्व हकीकत ऐकून अत्यंत आनंद मानिला. अहाहा ! प्रिय वाचकहो, सुधाकर आणि तापसी यांना आपल्या घरीं पाहून लावण्यमयीच्या हृदयांत किती आनंदाचें भरतें आलें असेल याची तुह्मीच कल्पना करा.

पुढें सरलेनें लावण्य आणि सुधाकर यांच्या उद्यानक्रीडेची हकीकत बाबूसाहेबांस निवेदन केली. तेव्हां बाबूसाहेबांच्या रोमरोमावर आनंद खेळूं लागला ! आणि त्या दिवसापासून लज्जा आणि विनय यांनीं असा आपला प्रभाव गाजविला कीं, लावण्य लपून लपून सुधाकराशीं बोलूं लागली ! व सुधारकही छपून छपूनच ! !

# नवम परिच्छेद.

---:o:---

## विवाह मंगल.

रमेशबाबूंचें वर्तन जुन्या चालीरीतींस धरून असे. परंतु अंधपरंपरेनें चालत आलेल्या विघातक रूढींस मात्र ते बिलकुल चिकटून रहात नसत. आणि प्रसंगोपात्त जुन्या वेडगळ चालींची टर उडवितांना ते जुन्या मंडळींची मुळीं देखील भीति बाळगीत नसत. त्यांनीं लोकापवाची फारशी पर्वा न करितां जिचें कुळगोत वगैरे कांहींच माहीत नाहीं अशा योगिनीच्या कन्येशीं आपल्या पुत्राचें लग्न करण्याचा निश्चय केला. आणि ती गोष्ट दिरंगाईवर न टाकितां त्यांनीं त्वरित तिथिनिश्चयही करून टाकिला. बाबूसाहेबांच्या वाड्यांत जिकडे तिकडे या भावी विवाहसमारंभाची गडबड सुरूं झाली. लग्नाचे अगोदर कित्येक दिवस गाणेंबजावणें आणि नाचरंग यांची सुरुवात झाली. सर्व लोक आमोदप्रमोदांत दंग होऊन गेले. या लग्नसमारंभानें सारें हरिपूर नगर जणूं आनंदचंद्रिकेंत बसून हास्य करीत आहेसें दिसत होतें. बाबूसाहेबांनीं या लग्नाप्रीत्यर्थ आपलें दोन महिन्यांचें उत्पन्न म्हणजे सुमारें दहा हजार रुपये खर्च करण्याचें ठरविलें होतें. तसेंच आणखी एक महिन्याचें उत्पन्न अर्थात् पांच हजार रुपये गोरक्षण, सार्वजानिकसभा, वाचनालयें दवाखाने, अनाथगृहें, पाठशाळा आदिकरून देशहिताच्या कृत्यांकडे देण्याचें योजिलें होतें. सर्व बेत यथास्थित जुळून आला. त्यांनीं आपल्या खाजगी बागेंतील प्रशस्त बंगला लावण्यमयीचे घरच्या मंडळींस जानवशास दिला होता. कन्येकडील सर्व खर्चही बाबूसाहेबच करण्यास तयार होते. परंतु योगिनीनें ती गोष्ट मान्य केली नाहीं.

ती ह्मणाली " मला जें काय तुळशीपत्र अनुकूल होईल तेवढ्यांतच मी मुलगी पिंवळी करून देणार. " सगळें ठीक झालें. पण कन्यादान कोणाच्या हातून व्हावयाचें? योगिनीला ही गोष्ट विचारण्याचें कोणासही धैर्य झालें नाहीं.

गांवांत सर्व लोक एकमेकांत कुचकुच करूं लागले कीं " ती कोणी हलक्या जातीची कन्या आहे. केवळ तिच्या रूपास भुलून बाबूसाहेब कुळगोत आणि मानमर्यादा यांवर पाणी सोडण्यास तयार झाले आहेत. " परंतु लोकांच्या या कुजबुजीची बाबूसाहेबांनीं कांहींएक पर्वा केली नाहीं.

विवाहाचा दिवस आला. मोठ्या थाटानें (तद्देशीय चालीप्रमाणें) प्रथमतः वरात निघाली. अतशबाजी सुटली, नवरदेव कन्येच्या घरीं विवाहास आला आणि जिकडे तिकडे एकच धांदल सुरूं झाली. लगिनघाईच ती ! तिचें कोठवर वर्णन करावें ! जाग्याची मोठी टंचाई. मंडपाचे मध्यभागीं कन्यादानाची वेदी होती. तेथें गेल्यावर रमेशबाबूंनीं पाहिलें तों एक पुरुष कन्यादान करण्यासाठीं तेथें बसला असून योगिनीबरोबर त्याचें ग्रंथिबंधन झालें आहे. त्या पुरुषास पाहतांच बाबूसाहेब केवळ स्तंभित, आश्चर्यचकित आणि पुलकित होऊन गेले. त्यांच्या मुखांतून एक शब्दही बाहेर पडेना. त्यांचें शरीर थरथर कापूं लागलें. वधुवरांवर मंत्राक्षता पडतांच मोठ्या त्वरेनें ते घरीं निघून आले. आणि आपल्या पत्नीजवळ कांहीं विचारपूस करूं लागले.

रमेशबाबू—प्रिये, लावण्य कोणाची मुलगी ? तुला कांहीं माहीत आहे काय?

सरला—योगिनीची.

रमेशबाबू—योगिनीनें तुला आणखीं कांहीं सांगिलें आहे काय?

**सरला**—कांहीं नाहीं. परंतु ती ह्मणत होती कीं, विवाह झाल्यावर आणखीं कांहीं सांगेन ह्मणून.

**रमेशबाबू**—कन्यादान करावयास कोण बसलें होतें, तें तूं नीट पाहिलेंस काय?

**सरला**—हो चांगलें पाहिलें. तेच **योगिनी**बरोबर असत. आणि लावण्यचे पिता तेच.

**रमेशबाबू**—प्रिये, आपण मोठे भाग्यवान् ह्मणून हीं सोयरीक घडून आली. ते आपल्या गांवचे राजे आणि जमीदार **शशिशेखरबाबू** आहेत!

**सरला**—काय ह्मणतां! ते आपले राजेसाहेब आहेत?

**रमेशबाबू**—हो हो, मीं त्यांना चांगलें ओळखिलें. खरोखर ती राजकुमारी आमची गृहलक्ष्मी व्हावी इतकें आमचें भाग्य होतें अँ!

**सरला**—" ईश्वराची लीला अगाध " ह्मणतात तें याला!

**रमेशबाबू**—तूं एकदां **योगिनी**ला हळूंच पुसून तर पहा.

**सरला**—ठीक, मी विचारतें तिला.

**सरले**नें **योगिनी**स सर्व हकीकत विचारली आणि **योगिनी**नें सरळपणें ती तिजला निवेदन केली. **योगिनी** ह्मणाली " बंडखोर लोकांच्या दंग्याच्या वेळीं आमच्या हद्दींत पुष्कळ लोकांचे खून झाल्यामुळें राजेसाहेबांवर—प्रस्तुतच्या **योगिराजां**वर—इंग्रजसरकारचा ठपका आला. तेव्हांपासून ते वेष बदलून देशोदेशीं फिरत आहेत. आमची प्रस्तुतची बाकीची अवस्था तुला माहीत आहेच. कृपा करून आतां सांगितलेली गोष्ट बाहेर फुटूं देऊं नकोस. "

**सरला**—तर मग तुह्मी महाराणी **चंद्रावली** आह्मांत?

**योगिनी**नें " होय " ह्मणून **सरले**स घट्ट पोटाशीं आवळून धरिलें. तो प्रसंग वर्णनातीत होय! असो. ती गोष्ट **सरला** आणि **रमेशबाबू** यांच्याशिवाय तिसऱ्याच्या कानीं गेला नाहीं. विवाह

समारंभ सांगोपांग शेवटास गेला. हळूं हळूं लग्नाची धांदल मोडून घरांत शांतता दिसूं लागली. राजा आणि राणी यांचा पुन्हां कोणासही त्राग लागला नाहीं. रमेशबाबू आणि सरलादेवी नववधूचें चोज करण्यांत निमग्न झालीं. वाचकहो, सुधाकर आणि लावण्य यांच्या निरुपम प्रेमानंदास पारावार नाहींसा झाला ! तें दांपत्य नूतन प्रणयसागरांत जणूं पोहूं लागलें.

---

## परिशिष्ट.

इकडे कांहीं काळ लोटल्यावर सरकारानें राजेसाहेबांस निर्दोषी समजून त्यांचेवरील आरोप काढून त्यांस पुन्हां आपली जमीदारी चालविण्याची परवानगी दिली.

पुढें सुमुहूर्त पाहून राजाराणींनीं आपल्या प्रासादांत प्रवेश केला. त्यांनीं एक शिवमंदिर काशींत आणि एक राधाकृष्णाचें मंदिर वृंदावनांत बांधवून त्यांच्याकरितां जमीनी तोडून दिल्या. तसेंच त्यांच्या पश्चात् ज्या ज्या कामदारांनीं इमानानें चाकरी केली आणि प्रसंगीं त्यांस उपयुक्त साहाय्य दिलें, त्यांनाही त्यांनीं जमीनी बक्षिस देऊन खुष केलें.

बाकीची लाखो रुपयांची संपत्ति त्यांनीं लावण्यमयीच्या नांवावर लिहून दिली. आणि अशा रीतीनें सर्व गोष्टींची निरवानिरव करून त्यांनीं काशीवासार्थ गमन केलें.

त्या अत्यंत पुण्यकारक अशा काशीक्षेत्रांत राहून राणी चंद्रावली आपल्या पतीच्या सेवेंत आणि इतर पुण्यकर्मांत आपला काळ घालवूं लागली. मधून मधून सुधाकर लावण्यला घेऊन तेथें येत

जात असे. परंतु, राजाराणींनीं आपला काशीवास सोडिला नाहीं. कालांतरानें तिकडे राजाराणी आणि इकडे रमेशबाबू आणि सरला यांचा परलोकवास झाला. तसेंच सुधाकर आणि लावण्य यांस कित्येक मुलेंलें-करें झालीं. तेव्हां लावण्यनें आग्रह करून आपली सर्व संपत्ति पतीच्या नांवानें करून दिली.

सुधाकरबाबूंचें योग्य वर्तन पाहून सरकारानें त्यांस **महाराज** आदि-करून कित्येक पदव्या दिल्या.

जे लोक लावण्यमयीस नीच जातीची कन्या समजत होते, त्यांना मागून अत्यंत लज्जित व्हावें लागलें.

लावण्यमयीच्या प्राप्तीनें सुधाकरबाबूंचा गृहस्थाश्रम धन्य झाला.



# कादंबरीकल्पद्रुम मासिकपुस्तक सुरू करण्याचा

# उद्देश.

देशोन्नतीच्या अनेक साधनांपैकीं वाङ्मयाची अभिवृद्धि हें एक होय, ही गोष्ट विद्वज्जनसंमत आहे. तसेंच कडू औषधास ज्याप्रमाणें गोड अनुपान अत्यंत अवश्य, त्याप्रमाणेंच वाचकांच्या मनांत नीतितत्त्वांचें बीजारोपण करण्यास कादंबरीसारखा मोहक विषय अत्यंत अनुकूल अतएव अत्यंत अवश्य होय. आणि ह्मणूनच वाङ्मयाच्या प्रधान अंगांत कादंबरीसारख्या विषयासही प्रधानपद देण्यास कोणी हरकत करील असें नाहीं. कादंबरीच्या वाचनानें वाचकांच्या मनावर कामविकारांचा पगडा बसून त्यांचें वर्तन बिघडतें, असा एक कादंबरीवर मोठाच आरोप आलेला आहे. परंतु, सरसकट सर्व कादंबऱ्या वरील वर्गांत येतील असें नाहीं. विशेषतः ऐतिहासिक कादंबऱ्या वरील आरोपापासून सर्वथा अलिप्त असतात, असें ह्मणण्यास फारसा प्रत्यवाय येईल असें नाहीं.

आपल्या महाराष्ट्रभाषेंत आजपर्यंत ज्या कादंबऱ्या लिहिल्या गेल्या त्यांपैकीं कांहीं अपवादक अशा खेरीजकरून बहुधा सर्व एकाच धर्तीच्या आहेत. अगदीं अव्वल प्रसिद्ध झालेल्या **मुक्तामाला** नांवाच्या कादंबरीनंतर सुमारें पंचवीस वर्षें एक धर्तीच्या निरस कादंबऱ्या प्रसिद्ध होत गेल्या. परंतु अलीकडे **करमणूक**कारांच्या लेखणीस सुरुवात झाल्यापासून तें मन्वंतर बदलत चाललें आहे ही मोठ्या संतोषाची गोष्ट आहे. अस्तु.

आमचा उद्देश " अगदीं नवीन धर्तीच्या **हिंदी** आणि **बंगाली** भाषांत

लिहिलेल्या उत्कृष्ट कादंबऱ्या आपल्या महाराष्ट्रभाषेंत अनुवादरूपानें देऊन देशभाषेची सेवा करावी " असा आहे. ज्या कादंबऱ्यांच्या वाचनानें वाचकांचें मनोरंजन होऊन त्यांचे मनावर सत्परिणाम होईल अशाच कादंबऱ्यांची निवड करण्याची आह्मांकडून खबरदारी घेतली जाईल.

प्रस्तुतचा आमचा प्रयत्न उदार आणि रसिक महाराष्ट्रियांच्या आश्रयावरच सर्वथा अवलंबून असल्यामुळें त्यांस उदार आश्रय देण्याविषयीं विनंति करून आणि या प्रयत्नास यश देण्याविषयीं जगच्चालकाची अनन्यभावें करुणा भाकून पुढील कार्यास सुरुवात करितों.

**संपादक** — " कादंबरीकल्पद्रुम. "

---

# सालअखेर.

——:O:——

सच्चिदानंद प्रभूच्या कृपाप्रसादानें आणि कृपाळू आश्रयदात्यांच्या प्रोत्साहनानें वर्षारंभीं संकल्प केल्याप्रमाणें आज आह्मी हा कल्पद्रुमाचा बारावा अंक समाप्त करून आश्रयदात्यांच्या सेवेस अर्पण करण्यास समर्थ झालों आहों. तरी, या प्रसंगीं आमच्या आश्रयदात्यांशीं दोन शब्द बोलून मागील व पुढील कार्यक्रमाचा हिशेब देणें अवश्य आहे.

कल्पद्रुमाच्या द्वारें आजपर्यंत १ **लावण्यमयी** २ **कृष्णकांताचें** मृत्युपत्र ३ **दीरेन्द्रवीर** अथवा कटोराभर रक्त ४ **युगलांगुलीय** ५ **अकबर** ६ **कुसुमकुमारी** आणि ७ **जया** अशा सात कादंबऱ्यांच्या प्रकाशनास सुरुवात झाली व त्यांतील पहिल्या चार संपूर्ण होऊन मुखपृष्ठ वगैरेसह वाचकांस मिळाल्या. त्यांशिवाय **तरुबाला** आणि **वीरेंद्रसिंह** अशीं दोन स्वतंत्र पुस्तकें बाक्षिस ह्मणून देण्यांत आलीं. बाकी राहिलेल्या तीन कादंबऱ्याही पुढील वर्षाच्या सहाव्या अंकापर्यंत समाप्त होतील असा अदमास आहे

गेल्या वर्षी अत्यंत दुष्काळाचे दिवस असतांही आमच्या कृपाळू आणि परम रसिक आश्रयदात्यांनीं आह्मांस योग्य वेळीं साहाय्य देऊन आमचे कडून ही मातृभाषेची सेवा घडविली याबद्दल आह्मी त्यांचे अत्यंत आभारी आहों. पुढील वर्षीही त्यांनीं असाच आपला उदार हस्त पुढें करून आणि शिवाय आपल्या इष्टमित्रांसही आश्रय देण्याविषयीं शिफारस करून आह्मांस प्रोत्साहन द्यावें अशीं त्यांस सविनय विनंति आहे.

पुढील वर्षी आमच्या अनेक वंगभाषाकोविद मित्रांनीं आह्मांस लेखनद्वारें साहाय्य देण्याची इच्छा प्रदर्शित केली आहे. त्यांपैकीं **श्रीयुत बापू नरसिंह भावे** यांचेकडून बंकिमचंद्रांचें " चंद्रशेखर " व **श्रीयुत माधवानुज** यांचेकडून " कपाल कुंडला " बडोदें येथील प्रसिद्ध " दुर्गेशनंदिनी " वगैरे पुस्तकांचे कर्ते श्रीयुत **शिवराम गोविंद फाळके** यांचेकडून बाबू **आर. सी. दत्त** यांची " जीवनसंध्या " आणि बाबू **देवी प्रसन्न राय चौधुरी** यांची " संन्यासी " नामक उत्कृष्ट कादंबरी, हे विषय खात्रीपूर्वक यावयाचे असून शिवाय श्रीयुत **रामचंद्र निळकंठ सहस्रबुद्धे** आणि प्रसिद्ध " माधवी कंकण " या पुस्तकाचे कर्ते श्रीयुत **आत्माराम आपाजी पांडे** यांचे कडूनही एकदोन सुंदर प्रकरणें मिळण्याचा संभव आहे. पुढील वर्षाकरितां आमचे मित्र श्रीयुत **बा० न० भावे** यांनीं मूळ बंगालीवरून मराठींत लिहिलेलें " **विजयवसंत** " नामक अप्रतिम नाटक बक्षिस देणार आहों.

यंदाचे वर्षी आमच्या ६०० पृष्ठांच्या वचनाप्रमाणें सर्व पृष्ठें ग्राहकांस मिळालीं नाहींत ही गोष्ट आमच्या लक्ष्यांत आहे. तरी तीं बाकी राहिलेलीं पृष्ठें पुढील सालीं एकाद्या सणानिमित्त जादा अंक काढून ग्राहकांस पोंचती करण्याचा आमचा मानस आहे. अस्तु.

या वर्षी आमचे येथील व्यवसायबंधु " श्रीशंकर " छापखान्याचे मालक **श्रीयुत गजानन श्रीधर केळकर** यांनीं आह्मांस छपाईचें काम सवलतीनें काढून दिलें, याबद्दल आह्मी त्यांचे अत्यंत आभारी आहों.

त्याप्रमाणेंच " मोदवृत्त " छापखान्याचे विद्वान् मालक **श्रीयुत काशीनाथ वामन** उर्फ **भाऊशास्त्री लेले** आणि " वृत्तसार " छापखान्याचे मालक श्रीयुत **लक्ष्मण माधवराव वैद्य** यांनींही आह्मांस वेळोवेळीं अनेक प्रकारें साह्य केलें याबद्दल त्यांचेही आह्मी अत्यंत आभारी आहों.

यापुढें **कल्पद्रुमाचें** सर्व काम " मोदवृत्त " छापखान्यांतच निघावयाचें असल्यामुळें व तें उत्तम प्रकारें आणि सवलतीनें काढून देण्याविषयीं त्याच्या मालकांचें आह्मांस अभिवचन असल्यामुळें त्या संबंधांत आह्मी निर्धास्त झालों आहों. गुदस्तसालीं कल्पद्रुमाचे अंक प्रतिमासीं काढण्यास आह्मांस सवड झाली नाहीं. तथापि यंदाचे वर्षी अगदीं नियमानें प्रतिमासी अंक ग्राहकांकडे रवाना करण्याची व्यवस्था केली आहे. याप्रमाणें मागील व पुढील सालाच्या कार्यक्रमाचा साधारण हिशेब आश्रयदात्यांस निवेदन केला आहे. शेवटीं हा आमचा प्रयत्न निर्विघ्न पणें शेवटास नेण्याविषयीं सच्चिद्धन परमेश्वराची प्रार्थना करून आश्रयदात्यांची रजा घेतों.

**संपादक** — " कादंबरीकल्पद्रुम. "

# आमचीं विक्रीचीं पुस्तकें.

## भारतवर्षीय युवतीरत्नमाला.

या पुस्तकांत इतिहासप्रसिद्ध अशा पतिव्रता, राजकार्यकुशल आणि सदाचारसंपन्न वीस स्त्रियांचीं मनोरम चरित्रें ग्रथित केलीं आहेत. हें पुस्तक आबालवृद्ध स्त्रीपुरुषांनीं वाचण्यास योग्य झालें आहे. या पुस्तकांतील भाषापद्धति इतकी चटकदार आहे कीं, ती वाचकांस तल्लीन केल्याशिवाय सोडीत नाहीं. पुस्तकाच्या चांगुलपणाबद्दल **कै. ना. महादेव गोविंद रानडे, ना. बाळ गंगाधर टिळक, रा. सा. विनायक कोंडदेव ओक** आदिकरून अनेक सद्गृहस्थांचे उत्तम अभिप्राय आलेले आहेत. तसेंच मार्मिक रीतीनें पुस्तकपरीक्षा लिहिणाऱ्या **केरळ कोकिळ** आणि **विविधज्ञानविस्तार** या मासिक पुस्तकांचे तर फारच उत्कृष्ट अभिप्राय आलेले आहेत. एवंच, या पुस्तकाच्या चांगुलपणाबद्दल संपूर्ण महाराष्ट्रभाषाकोविदांची एकवाक्यताच आहे, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. पुस्तकाची बांधणी सोनेरी; अक्षरांची उंची कापडाची केलेली असल्यामुळें तें सर्वांगसुंदर झालें आहे. अशा या संग्रहणीय पुस्तकास रसिक महाराष्ट्र वाचकांनीं आपला उदार आश्रय द्यावा अशी त्यांस सविनय विनंति आहे. किंमत १॥ रुपाया टपाल खर्च शिवाय.

## विजयादशमी.

या छोटेखानी निबंधांत विजयादशमी ( दसरा ) च्या सणाचें साग्र वर्णन असून त्यासंबंधानें पौराणिक आणि ऐतिहासिक माहितीही विपुल दिलेली आहे. या निबंधाची भाषा आवेशयुक्त आणि स्वदेशप्रीतीच्या मधुर रसानें थबथबलेली आहे. पुस्तकाच्या चांगुलपणाविषयीं "बालबोध" "महाराष्ट्र-कोकिल" इत्यादि मासिक पुस्तकांचे उत्कृष्ट अभिप्राय आले आहेत. किंमत एक आणा ट. ह. शिवाय.

# स्मरणशक्ति कशी वाढवावी.

या छोटेखानी निबंधांत स्मरणशक्ति संबंधानें चटकदार भाषेंत उत्कृष्ट विवेचन केलें असून तिच्या संवर्धनार्थ कांहीं उपायही सुचविले आहेत. विद्यार्थ्यांनीं तर अवश्य संग्रह करावा. किं. एक आणा ट. ह. शिवाय.

# तरुबाला.

**कादंबरीकल्पद्रुमाच्या** ग्राहकांस बक्षिस दिलेलें निर्णयसागरी कामाचें सर्वांगरमणीय नाटक. हें नाटक प्रसिद्ध बंगाली नाट्याचार्य **बाबू अमृतलाल बोस** यांच्या उत्कृष्ट नाटकांपैकीं असून त्याच्या भाषांतरानें मराठीं भाषेस एक नामी जोड झाली आहे. किं. १० आणे ट० ह० शिवाय.

# वीरेंद्रसिंह.

कल्पद्रुमाच्या ग्राहकांस दिवाळीची भेट ह्मणून बक्षिस दिलेलें पुस्तक. यांत शृंगार आणि वीर हे दोन रस ओतप्रोत भरले आहेत. पुस्तक फारच चटकदार आहे. किंमत २ आणे ट० ह० शिवाय.

# कादंबरीकल्पद्रुमपुष्पमाला.

| पुष्प | किं. रु. | आ. |
|---|---|---|
| १ लें—लावण्यमयी.... ... ... ... ... | ० | ४ |
| २ रें—कृष्णकांताचें मृत्युपत्र. ... ... ... | ० | १२ |
| ३ रें—वीरेंद्रवीर अथवा कटोराभर रक्त.... | ० | १२ |
| ४ थें—युगलांगुलीय. ... ... ... ... ... | ० | ४ |
| ५ वें—अकबर. ( छापत आहे. ) ··· ··· | ० | १२ |
| ६ वें—जया. ( छापत आहे. ) ··· ··· | ० | १० |
| ७ वें—राधाराणी. ( छापत आहे. ) ... | ० | ४ |
| ८ वें—चंद्रशेखर. ( छापत आहे. ) ... | १ | ० |
| ९ वें—कुसुमकुमारी ( छापत आहे. ) ··· | १ | ० |

## ( पुष्प पहिलें ) लावण्यमयी.

ही लोकोत्तर कादंबरी एकवेळ हातीं घेतल्यावर संपूर्ण वाचल्या-शिवाय पुस्तक खालीं ठेववतच नाहीं ! आणि छोटेखानी असल्यामुळें फारसा वेळही मोडीत नाहीं ! ! ही कादंबरी किती चटकदार आहे, हें स्वतःच अनुभवण्याची आह्मी ग्राहकांस शिफारस करितों. किं. ४ आणे ट. हं. शिवाय.

## ( पुष्प दुसरें ) कृष्णकांताचें मृत्युपत्र.

ही कादंबरीकल्पद्रुमांतून प्रसिद्ध झालेली कादंबरी रायबहादुर **बंकिम-चंद्र** ह्यांच्या अप्रतिम कादंबऱ्यांपैकीं एक आहे. ही कादंबरी इतकी उत्कृष्ट आहे कीं, ती आंग्ल लोकांसही प्रिय झाल्यामुळें तिचें इंग्रजींत भाषांतर झालेलें आहे. प्रस्तुतचें मराठी भाषांतरही सर्वोत्कृष्ट साधलें असल्याबद्दल अनेक रसिक विद्वानांचे अभिप्राय आलेआहेत. किं. १२ आणे ट. हं. शिवाय.

## ( पुष्प तिसरें ) वीरेंद्रवीर अथवा कटांगभर रक्त.

प्रसिद्ध हिंदी कादंबरीकार बाबू **देवकीनंदन खत्री** यांनीं मूळ हिंदी भाषेंत लिहिलेल्या कादंबरीचें मराठी भाषांतर. प्रस्तुत पुस्तकाची योग्यता तें एक वेळ वाचल्यावांचून कळावयाची नाहीं. बाबू **देवकीनंदन** यांच्या कल्पनाशक्तीचें हें पुस्तक उत्कृष्ट द्योतक आहे. किं. १२आ. ट. हं० शिवाय.

## ( पुष्प चवथें ) युगलांगुलीय.

रायबहादूर **बंकिमचंद्र चतरजी** यांच्या मूळ बंगाली कादंबरीचें मराठी भाषांतर. या कादंबरीच्या चटकदारपणाविषयीं शिफारस करणें ह्मणजे केवळ चांगल्या शब्दांचें चर्वितचर्वण करणें होय. किं. ४ आणे. ट० हं० शिवाय.

**चितळे आणि मंडळी. वाई ( जिल्हा—सातारा. )**

# कादंबरीकल्पद्रुम.

वरील नांवाचें डेमी अष्टपत्री सांचाचें अठेचाळीस पृष्ठांचें मासिक-पुस्तक आह्मीं **वाई** येथें शके १८२२ च्या वर्षप्रतिपदेपासून सुरू केलें आहे. यांत सुप्रसिद्ध बंगाली आणि हिंदी कादंबरीकार रायबहादूर **बाबू बंकिमचंद्र चतरजी,** लखनौ येथील कांग्रेसचे अध्यक्ष बाबू **आर. सी. दत्त** आणि **काशीनिवासी** बाबू **देवकीनंदन खत्री** इत्यादिकांनीं लिहिलेल्या चटकदार कादंबऱ्या शुद्ध, सरळ आणि मनोहर अशा महाराष्ट्र भाषेंत अनुवादरूपानें देण्याचें योजिलें आहे. या मासिकपुस्तकाच्या द्वारें प्रसिद्ध झालेल्या कादंबऱ्या सर्वमान्य होऊन वाचकांच्या अंतःकरणास चटका लावून सोडीत आहेत. आणि हिंदी व बंगाली भाषेंतील या अपूर्व वाङ्मयाचा परिचय झाल्यानें त्याविषयीं लोकांस मोठा अचंबा वाटत आहे. तरी रसिक व उदार महाराष्ट्रीयांनीं या मासिक पुस्तकास आपला उदार आश्रय देऊन आह्मांस अनुगृहीत करावें अशी त्यांस सविनय विनंति आहे.. या मासिकपुस्तकाच्या द्वारें बक्षिस पुस्तकांसह ग्राहकांस वर्षाचीं सुमारे ८०० पृष्ठें मिळतील. याची ट. ह. सह वर्गणी २॥ रुपये आहे. व्ही. पी. अगर मनीऑर्डर चार्ज निराळा पडेल. ग्राहकांनीं पूर्ण पत्त्यासह मागणी करावी. अंक व्ही. पी. नें रवाना करूं.

**अनंत केशव चितळे आणि मंडळी.**
गणपती आळी—**वाई.**
( जिल्हा—**सातारा.** )

# कादंबरीकल्पद्रुम

वरील नांवाचें डेमी अष्टपत्री सांचाचें अठेचाळीस पृष्ठांचें मासिकपुस्तक आह्मीं वाई येथें शके १८२२ च्या वर्षप्रतिपदेपासून सुरू केलें आहे. यांत सुप्रसिद्ध बंगाली आणि हिंदी कादंबरीकार रायबहादूर बाबू बंकिमचंद्र चतरजी, लखनौ येथील कांग्रेसचे अध्यक्ष बाबू आर. सी. दत्त आणि काशीनिवासी बाबू देवकीनंदन खत्री इत्यादिकांनीं लिहिलेल्या चटकदार कादंबऱ्या शुद्ध, सरळ आणि मनोहर अशा महाराष्ट्र भाषेंत अनुवादरूपानें देण्याचें योजिलें आहे. या मासिकपुस्तकाच्या द्वारें प्रसिद्ध झालेल्या कादंबऱ्या सर्वमान्य होऊन वाचकांच्या अंतःकरणास चटका लावून सोडीत आहेत. आणि हिंदी व बंगाली भाषेंतील या अपूर्व वाङ्मयाचा परिचय झाल्यानें त्याविषयीं लोकांस मोठा अचंबा वाटत आहे. तरी रसिक व उदार महाराष्ट्रीयांनीं या मासिक पुस्तकास आपला उदार आश्रय देऊन आह्मांस अनुगृहीत करावें अशी त्यांस सविनय विनंति आहे या मासिकपुस्तकाच्या द्वारें बक्षिस पुस्तकांसह ग्राहकांस वर्षाचीं सुमारें ८०० पृष्ठें मिळतील. याची ट. ह. सह वर्गणी २॥ रुपये आहे. व्ही. पी. अगर मनीऑर्डर चार्ज निराळा पडेल ग्राहकांनीं पूर्ण पत्त्यासह मागणी करावी अंक व्ही. पी. नें रवाना करूं.

अनंत केशव भिडे आणि मंडळी.
गणपती आळी—वाई.
( जिल्हा—सातारा. )